# प्रकरण - चार

## धनुर्धारी ' यांच्या कादंबरीतील व्यक्तीचित्रणे --

## प्रकरण चौथे

## ` धनुर्धारी ` यांच्या कादंबरीतील व्यक्तिचित्रणे --

### प्रस्तावना --

मागीलप्रकरणामध्ये आपण ` वाईकर भटजी ` आणि ` पिराजी पाटील ` या कादंबऱ्यांच्या आशयसौंदर्याविषयी विचार केला .आता या प्रकरणामध्ये ` वाईकर भटजी ` आणि ` पिराजी पाटील ` मधील व्यक्तिचित्रणाविषयी आपण विचार करणार आहोत.

कादंबरीतील कथानकास जो अर्थ प्राप्त होतो व मूल्य लाभते ते व्यक्तिमुळेच होय. व्यक्तिदर्शन आणि पात्रामुळेच कादंबरीतील घटनांचे आकर्षण वाढते. कादंबरीतील पात्रे प्रथम लेखकाच्या कल्पनेत आकाराला येतात. नंतर कथानकाची गुळणी होत असते. निवेदन,पात्र,संवाद यांच्या माध्यमातून कादंबरी व्यक्तिदर्शन घडविले जाते. जे जीवन कादंबरीत रंगविलेले असते त्यानुसार प्रमुख पात्राचे अथवा गौण पात्राचे व्यक्तिदर्शन घडविलेले असते. कादंबरीतील पात्रे जीवंत व वास्तव असावीत,त्याचे वागणे त्यांच्या स्वभावाशी सुसंगत असावे व वाचकासमोर ती मूर्तीमंत साकार व्हावीत एवढीच त्यात अपेक्षा असते.

` वाईकर भटजी ` आणि ` पिराजी पाटील ` या दोन कादंबरीमध्ये धनुर्धारीने व्यक्तिचित्रणाच्या आधारावर चांगल्या प्रकारचे जीवनदर्शन घडविले आहे.त्या कादंबरीमध्ये जे व्यक्तिचित्रण रेखाटले आहे ते डोळ्यात भरण्यासारखे असे आहेत. ` वाईकर भटजी ` या कादंबरीमध्ये वाईकर भटजी,अन्नपूर्णाबाई,मोरोबा, बाळासाहेब नेने,गोविंदराव नेने, गोपाळ इ.महत्वाचे व्यक्तिचित्रणे येतात. तर ` पिराजी पाटील ` या कादंबरीमध्ये पिराजी पाटील,सोयराबाई,गोपाळपंत कुलकर्णी, सुभानवा मामा,दौलत्या ,संपतराव जाधव इ. महत्वाची व्यक्तिचित्रणे येतात. या अनेकविध व्यक्ती कशा प्रकारे जीवन जगतात,येणाऱ्या प्रसंगाला कशा प्रकारे सामोरे जातात याचे प्रत्ययकारी चित्रण या दोन कादंबऱ्यामध्ये केले आहे ते पुढीलप्रमाणे --

## ' वाईकर भटजी ' या कादंबरीतील व्यक्तिचित्रणे --

### १) वाईकर भटजी ( त्र्यंबक भटजी )

' वाईकर भटजी ' या कादंबरीतील प्रमुख पात्र म्हणजे त्र्यंबकभटजी उर्फ वाईकर भटजी .' वाईकर भटजी' ही कादंबरी म्हणजे एकंदरीत भटजीच्या जीवनाची कहाणी आहे.भटजी अनेक अडिअडचणीवर,दारिद्र्यावर मात करुन जीवन जगलेले आहेत.त्याच्या जगलेल्या जीवनाचा हा आलेख आहे. तेव्हा ते म्हणतात' माझे जीवन बोधपर नाही पण इतराना मनोरम आहे असे वाटल्याचा संभव आहे.' [१] जगामध्ये प्रत्येक माणूस संसारामध्ये सुखापेक्षा दु:खेच जास्त असतात. असा उद्गार सर्वांच्या मुखावाटे निघतो खरा पण अशा दु:खमय व क्लेशदायक संसाराचा त्याग मात्र कोणी ही करीत नाही. उलट संसाराला मगरमिठी मारण्यासाठी प्रत्येकजण हापापलेला असतो.तशीच स्थिती या वाईकर भटजी ची झाली आहे. त्याचे वर्णन स्वत:हा वाईकर भटजी करतात त्यातून भटजी आणि त्यांचा संसार कसा होता याचे दर्शन आपणास घडते. भटजी या पूर्ण कादंबरीमध्ये समंजस व विचारी भूमिकेतून आपल्या परिवाराकडे व संसाराकडे पहाताना दिसतात.

भटजी हे पूर्णपणे पिढीजात,पूर्वपरंपरेने जीवन जगणारे असे आहेत. तात्कालीन परिस्थितीप्रमाणे त्याचा विवाह त्यांच्या वडिलांच्या मनाप्रमाणे ठरलेला आहे.त्याला भटजीची पूर्णपणे मान्यता आहे. भटजीची जी काही विचार-सरणी आहे त्याप्रमाणे सुदैवाने त्यांना पत्नी अन्नपूर्णाबाई मिळाल्या आहेत. भटजीच्या दारिद्र्य संसारातून पत्नीचा हातभार लागेल अशी ती समंजस व विचारी आहे. यामुळे भटजीना मनापासून समाधान वाटलेले आहे. म्हणून भटजी म्हणतात ' तिची ती सुप्रसन्न मुद्रा, ते गृहदाक्षिण्य व साधारण सुजानपणा हो माझ्या एकंदर प्रपंच सुखाची मुख्य साधने ही माझी पक्की समजूत ठरली.' [२] यातून त्याच्या पत्नीविषयी व प्रपंचाविषयीची आपणास कल्पना येते.

भटजीना अन्नपूर्णाबाई या गुणी व समजूतदार बायकोपासून ५ अपत्य झाली. त्यामध्ये ३ मुले व २ मुली.त्यापैकी मोठा मुलगा गोंविद उर्फ बाळा,

दुसरे दोन मुले विष्णू व गोपाळ. मुलींपैकी मोठया मुलीचे नाव आवडी ,दुसरी मुलगी बगाडी. असा हा त्र्यंबकभटजीचा परिवार आहे. परिवार सांभाळत असताना भटजीची ससेहोलपट होते.त्या प्रत्येक प्रसंग आणि घटनातून भटजीचे व्यक्तिचित्र आपोआप साकार होते.भटजीचा मुख्य व्यवसाय भट-भिक्षुकीचा होता. म्हणजे पूर्ण दुस-याच्या द्रव्यावर चालणारा धंदा. परंतु बदलणा-या परिस्थितीप्रमाणे हा धंदा सुध्दा कमी होत चालला होता. आणि कुटुंबाचा जबाबदारी मात्र वाढत चालली त्यामुळे दारिद्र्य वाटेला येवू लागले. घरी संसार चालविणे कठीण होऊ लागले अशा परिस्थितीत भटजीचा पुण्याचा मित्र मोरोबा भटजीकडे आला आणि पुण्यातील काही शिक्षणाबद्दलची माहिती देवून भटजीना पुण्याला चलण्याविषयी सुचविले. भटजीची परिस्थिती खालावत चालल्याने मुलगा शिक्षण घेईल आणि कुठेतरी नोकरीला लागेल आणि आपले दारिद्र्य कमी होईल या विचाराने भटजी पुण्यास जाण्याचे निश्चित करतात. पुण्यास जाण्यापूर्वी मोठया मुलाचा लग्नाचा प्रश्न पुढे येतो. विचाराअंती बाळ्याचे लग्न गोविंदरावची कन्या दुर्गी हिच्याशी ठरते.तिथी निश्चित होते.तेव्हा अन्नपूर्णाबाई वरमायी होऊन मिरवित असते पण भटजीना मात्र रात्रदिवस काळजी लागलेली असते. आता कसे ? पुढे निर्वाह कसा चालावा ? इ.अनेक प्रश्न त्याच्या समोर असतात. कोणत्या तरी निमित्याने भटजीला वाई सोडावयाची होती कारण त्याची परिस्थिती आतून नाजूक झालेली होती. ती त्यांना समाजाला दाखविता येत नव्हती.पण वाईकर मंडळी मात्र सर्वांना जाण्यास विरोध करीत होती.

भटजी स्वत:हा या कादंबरीचे निवेदक असल्याने त्यांनी ब-याच लहानसान गोष्टी,प्रसंग व घटनांचे चित्रण केले आहे. तेवढेच नव्हे तर त्या प्रसंगाने मनामध्ये निर्माण होणा-या भावभावनांचे,ताणातणावाचे चित्रण इतके परिणामकारकपणे करतात की,तो प्रसंग आपल्या डोळ्यासमोर उभा राहातो.वाई सोडून जाताना होणारी जीवाची दगदग आणि कोरडी कटकट त्यांना कशी सहन करावी लागते. याचे ही वर्णन यात ते करतात.गाव सोडताना वाटणारे गावातील माणसाचे; गावचे आणि आपल्या घरची ओढ त्याबद्दल भाष्य करताना दिसतात. पुण्याला

जाताना त्यांनी गावातील माणसाच्या भेटी घेतल्या किंवा त्याच्या व्याख्याच्या, गोविंदरावाच्या घरातून बाहेर पडतानाचा जो प्रसंग वर्णिला त्यावरुन व गोविंदरावाना आपल्या मुलीबद्दल समजूत देण्यावरुन वाईकर भटजीचे व्यक्तिमत्व फुलत जाते. त्यातून त्याच्या अंत:करणातील माणूस दिसायला लागतो. आणि घरातील कर्त्या पुरुषाचे चित्र त्याच्या रुपातून आपल्या डोळ्यापुढने सरकत जाते.

वाई सोडून ते पुण्यास जातात आणि आपल्या यजमानाच्या घरी उतरतात. तेव्हा यजमानानी तुम्ही वाई सोडली ही योजना फार चांगली केली म्हटल्यावर भटजीना आनंद वाटतो. त्याप्रमाणे ते आपण का व कशासाठी आलो हे सर्व सांगतात. उद्या आपली व्यवस्था करावी असे सांगून त्या यजमानाच्या मदतीने पुण्यामध्ये जीवनास प्रारंभ करतात. तेव्हा मात्र त्याना येणारा अनुभव बरेच काही देवून जातो. त्याचे वर्णन ते करतात. आणि पुण्यास आल्यावर प्रापंचिक त्रास, अन्नाची काळजी, पुढल्या तजविजी, पोराबाळाची तर्तूद इ. लचांड कमी होईल असे त्यांना वाटत होते. पण प्रत्यक्षात मात्र पूर्वीपेक्षाही मानसिक कटकटी व खर्चिक गोष्टी वाढायला लागतात. तेव्हा ते म्हणतात " दुरुन डोंगर साजरे " असे म्हणतात. ते काही खोटे नाही. जिकडे तिकडे हव्यास व आशा पाठिमागे लागलेले. तृप्तो म्हणू नाही." पैसा जगात फार चमत्कार करतो, संसारयंत्राचे मुख्य मलसूत्र पैसा. सुखाची जणनी आणि दु:खाची माता पैसा. तसेच मानपानाचे मुख्य बीज, अब्रू, इभ्रतीचे आधि-दैवत, इष्टामित्राचे प्रेम, गणगोताचा लळा, आणखी प्रत्यक्ष ईश्वराची कृपा देखील या पैशात।"[3] असे जे भटजी भाष्य करतात, त्यातून पैशाला आलेले महत्व आणि त्याची भटजीकडे असलेली कमतरता यातून भटजीच्या जीवनाची, संसाराची होणारी जीवघेणी ओढाताण, त्यातून त्यांनी केलेले समाजाचे निरीक्षण दृष्टीस येते. म्हणून ते म्हणतात " कोकणातून देशावर गेले तरी पळसाला पाने तीनच "

भटजी पुण्यास आल्यापासून अर्थिक दृष्टया ते गरिब होत जातात. तेव्हा त्यांनी आपले जीवलग मित्र मोरोबा याना येणारी मानसिक ओढाताण सांगतात. त्यावर मोरोबा भटजीना एक उपाय सुचवितो. तो म्हणतो आमच्या यजमानाकडून कर्ज घ्यावे. भटजीना मात्र कर्ज घेणे बरोबर वाटत नाही. ते आतापर्यन्त कर्ज काढलेले नाहीत. म्हणून ते म्हणतात " कर्ज म्हटले की, अंगावर काटा उभा रहातो. कर्ज आणि

यातना फार भयंकर मानहानी " म्हणून मोरोबाना कर्ज घेण्यास नकार देतात. परंतु पुढे घरातील पै-पाहुणे, मुलगी पाठविणे, सून पाठविणे, घर खर्च, इ. अनंत अडचणी उभे राहातात. तेव्हा नाविलाजाने ते मोरोबाला त्याचे यजमान बाळासाहेब नेने याचे कडून १५ रु. कर्ज काढण्यास सांगतात. आणि हे कर्ज पुढे १०० रु. पर्यन्त वाढत जाते. ते कर्जबाजारी होतात. कर्जबाजारी माणसाची लोकात पत नाही. मनात आनंद नाही. घरात बोज नाही, त्याच्या चितात स्वास्थ नाही, डोळ्याला झोप नाही, अन्नात रुचि नाही आणि शरिरात त्राण नाही अशी अवस्था असते. नेमकी तशीच अवस्था भटजीच्या आतापर्यन्तच्या जीवनचरित्रावरुन असल्याचे जाणवत रहाते. मोरोबा भटजीचे स्नेही असल्याने ते भटजीची काळजी करीत असतात त्यातूनच बगीसाठी एक स्थळ ते सुचवितात. ते म्हणजे त्याचे विधुरावस्थेतील यजमान बाळासाहेब नेने याचे तेव्हा ते स्थळ भटजीना पसंत पडत नाही, कारण बगी १० वर्षांची तर बाळासाहेब नेने ४० वर्षांचे असतात. याला ते स्पष्ट भाषेत विरोध करतात. आणि संतापून सडेतोड भाषेत मोरोबास म्हणतात" मी खाटीक नाही माझी पोर असल्या थेरड्यास द्यावयाला ! पोटची पोर थेरड्याच्या गळ्यात बांधण्यापेक्षा बेधडक तिला विहिरीत ढकलून देणे बरे ..... मुलगी म्हणजे काय ती घरसातील भाजी का जनावर .... आतड्याचा धर्म आतड्याला माहित "४

या भटजीच्या उद्‌गारातून भटजीचे वेगळेच रुप आपणासमोर उभे रहाते. ते कितीही कर्जबाजारी वा दारिद्रय असले तरी त्याना पैशाचा मोह मात्र नाही. पैशासाठी ते आपल्या मुलीला विकू पहात नाहीत. यातून त्याची आधुनिक विचारसरणी प्रत्ययास येते. त्यातून भटजीचे व्यक्तिमत्त्व उठावून दिसते. या प्रसंगातून त्यांना एक चांगला अनुभव येतो म्हणून ते म्हणतात" मतलबाशिवाय मनुष्य नाही" ते आपणास योग्यच वाटते.

मोराबानी भटजी कन्या बगीसाठी जे सावकाराचे स्थळ सुचविले ते भटजीना मान्य नाही. पण त्यातून भटजीचे मन मात्र मोरोबाच्या मैत्रीबद्दल शंका घेवू लागते. यातून भटजीने मैत्री विषयीचे त्याचे विचार मांडले आहे. असे असले तरी मोरोबावर भटजीचा विश्वास आहे. मोरोबा हा भटजीना परब्रह्म वाटतो. तो काही श्रीमंत

नव्हता. विद्या,किर्ती,पैसा या तिन्ही पैकी मोरोबास कोणतेच पाठबळ नव्हते. भटजी आणि मोरोबाचा स्नेह निरपेक्ष असा होता. जिवाला एक विसाव्याची जागा म्हणून ते मोरोबाला प्रिय मित्र समजत होते. एखादे कार्य साधण्यासाठी म्हणून त्यांनी मोरोबाशी स्नेह ठेवला नाही. ही कल्पनाही भटजीना शिवली नाही.यातून भटजीचा स्वभाव दिसून येतो. त्याच्या एकंदरीत चांगल्या-वाईट जीवनाचा परिणाम त्याच्या वागण्या बोलण्यातून सहज दिसून येतो. अन्नपूर्णाबाई काळजीने ग्रासलेल्या आपल्या पतीला म्हणतात" काय बाई,आज तीनचार दिवस पहाते,मेली काळजी काय असली लागली आहे कोण जाणे ! काल ही जेवण चांगले झाले नाही, परवा फराळ केला नाही,आणि मुलाशी बोलणे नाही,हसणे नाही,आपले सदानकदा कपाळास आठ्या घालून असे बसावयाचे होते कुणास ठावूक ?"[५] यातून अन्नपूर्णाबाईचे आपल्या पतीवरील प्रेम तर व्यक्त होतेच पण त्यापेक्षा ही भटजीला लागलेली जी काळजी आहे ती अधिक डोळ्यात भरते.जसे पत्नीचे प्रेम पतीवर आहे.तसेच भटजीचा समजूतदारपणा व पत्नीविषयीचे प्रेम खालील उद्गारातून व्यक्त होतो" अशा सर्वतोपरी अत्यंत कष्टमय संसारात अशी भली बायको ... हेच काय ते समाधान होय. बिचारी बायको काय,एक गरिब गाय ! तिचे सुख किंवा दु:ख सर्वतोपरी नव-याच्या स्वभावावर अवलंबून असावयाचे. नवरा दु:खी कि बायको दु:खी,तो सुखी तर ही सुखी".[६]

स्त्री विषयीची भटजीची विचारसरणी मात्र पूर्णपणे जुन्या स्वरुपाची आहे. स्त्रीला भटजी विचाराच्या दृष्टीने कमी लेखतात.स्त्री चे काम म्हणजे ' चूल आणि मुल ' अशीच विचारसरणी त्यांची आहे. एवढेच काय एखाद्या गोष्टीबद्दल विचार करताना ही स्त्रीबाबत त्याची भूमिका' बायकाची अक्कल गुडघ्याच्या खाली' या प्रमाणेच असल्याची जाणवत राहाते.आणि ते त्याप्रमाणे बोलताना ही दिसतात.बायकांचे गुणा पेक्षा दोष पुढे ठेवताना दिसतात.असे असले तरी ते संसारामध्ये स्त्रीच्या सहवासात येणारा अनुभव मात्र ते गुणादोषासह प्रामाणिकपणे व्यक्त करतात हे मात्र निश्चित.

वाईकर भटजी तसे हुशार असे त्याच्या आचरणातून जाणवते.एखादी

गोष्ट करावयाची म्हणजे त्याचा ते पूर्व विचार करीत असत.माणूस हा मुळातच मतलबी आहे. तो कोणत्या ना कोणत्या गरजेसाठीच एकमेकांच्या जवळ येत असतो. म्हणून भटजी म्हणतात" या दूनियेत एक सुध्दा असा मायेचा पूत नाही की ज्याला आपला मतलब सुटलेला नाही ... मनुष्य म्हणजे काही सोने,चांदी नव्हे त्याची खरी पारख करावयाची म्हणजे प्रसंगच पाहिजेत". ७ यातून भटजीना आलेल्या अनुभवातून जीवंत सत्य सांगावयाचे आहे ते अगदी बरोबर आहे.

भटजीचा संसारच सर्वसाधारण,दारिद्र्याने गांजलेला असल्याने त्यांना या जीवनाचा आणि संसाराचा वीट आला आहे. सतत संकटे, दु:खे,अडचणी,विवेचना, दगदगी ,त्रास,क्लेश,संताप,अपमान इ.मुळे ते पूर्णपणे निराश झाले आहेत.त्याचे मन त्यांना साथ देत नाही.संसारापेक्षा परमार्थाकडे त्याचे मन ओढ घेवू लागले आहे. एवढेच नव्हे तर,आत्महत्या,परागंदा कि संन्यास या विचारात भटजी पूर्णपणे बुडून गेलेले आहेत. त्याचे मन विचार करु लागले आहे.यातून आपण सुटून मुक्त होऊ पण माझी पत्नी,बाळ्या,बगडी,याचे काय होईल या विचाराने त्याचे मन पुन्हा संसारात रमू पहात आहे .समाज आपली निंदा नालस्ती करेल,असेही त्यांना वाटायला लागते.या विचाराने भटजी चिडखोर बनतात. आणि त्याचा त्रास घरातील सर्व लोकांना कसा सहन करावा लागतो,नव्हे स्व:ताहालाकसा पश्चाताप करावा लागतो ते बगडीला विनाकारण मारलेले चापट ` या प्रसंगातून दाखवून देतात. या त्यांना दारिद्र्य संसारातून व जीवनानुभवातून भटजीची जीवनदृष्टी व्यापक व समंजस झाली आहे. काही पौराणिक संदर्भ देवून ते आपली समजूत काढताना दिसतात. ते म्हणात " कर्मयोगातून कोणी कधी सुटला आहे ? मोठमोठे युधिष्ठिर ,नळ,दशरथी राम अशाना वनवास चुकला नाही,मग या त्र्यंबकभटजीची काय कथा ? "८ असे म्हणणारे भटजी मधी मधी ईश्वराला प्रार्थना करताना दिसतात.ईश्वराला शरण आल्याचे बोलून दाखवितात. तर पुढे ह्या भटजीना येणारा आपत्काळ हा आपला गुरु आहे असे वाटते.

भटजी पूर्णपणे काळजीने ग्रासून गेले आहे.त्यामुळे त्यांना तशीच स्वप्ने पडू लागली आहे. आजचा दिवस कसा जाईल आणि उद्याचा दिवस कसा येईल या काळजीमध्ये ते असतात. नारायणाचा खेळ म्हणतात त्याप्रमाणे जाळ्याला २० रु.

स्कॉलरशिप मिळते. ध्यानीमनी नसलेले स्थळ बगीसाठी गोविंदपंत नेने आणतात यातून भटजीना आनंद होतो. भटजी संसाराची मनसुबे रचायला लागतात. मात्र यावेळी भटजीना आपल्या मागील जीवनातील आठवण येते. मी गरिब अवस्थेत जीवन जगताना मात्र माझ्याकडे कुणाचेही लक्ष नव्हते. ते म्हणतात "मी आजवर कुणाला महत्वाचा माणूस वाटत नव्हतो. माझ्या विद्वत्तेचे कधी कुणास वाटले नाही. माझ्या अंगच्या अनेक सद्गुणाचे चहाते मला कोणी आजवर भेटले नव्हते, तर नुसते गुण पहाणारेही कोणी नव्हते. पण आता तो मनू बदलला ."[९] यातून भटजीना सांगायचे आहे की आज जो मी आहे तो कालही होतो. परंतु केवळ पैसा माझ्याजवळ नसल्याने समाज माझ्याकडे दुर्लक्ष करीत होता. आता चार पैसे जवळ येत आहेत तर माझ्या सगळीकडे उदो-उदो व्हायला लागला. यातून भटजीचे सामाजिक चिंतन आपणास दिसते. पैसा आणि सत्ता याच्यावर माणसाची किंमत जगात होत असते हे भटजी यातून सांगताना दिसतात. माणसाच्या परिस्थितीत किंवा जीवनात बदल झाल्यानंतर माणूस कसा बदलत जातो, याचे उदाहरण म्हणून भटजी स्व:ताहाचाअनुभव सांगतात. एकेकाळी दारिद्र्य परिस्थितीत भटजी देवाचे स्मरण करीत. आज त्याच गोष्टीकडे त्याचे विस्मरण होत आहे ते होणे कसे चुकीचे आहे हे सांगण्यासाठी ते कुंतीचे उदाहरण देतात. भटजी स्व:ताहाचे आत्मपरिक्षण ही करतात. माझ्या चांगल्या अशा स्वभावामध्ये कसा अहंकार येत गेला. साहाजिकपणा आजवर भटजीच्या जवळ होता तो नाहीसा कसा झाला. मुद्दामपणाकडे कसे सारे साम्राज्य गेले हे ते अगदी प्रामाणिकपणे सांगताना दिसतात. आपल्या सुधारित परिस्थितीचा परिणाम आपल्या पत्नीवर आपल्यापेक्षा जास्त प्रमाणात कसा झाला याचे हीवर्णन ते करतात. याबाबत पत्नीला कशा चार गोष्टी समजावून सांगितल्या, मागिल परिस्थितीची जाणिव कशी करुन दिली, त्यातून पत्नीमध्ये कसा बदल झाला, हे ही ते सांगतात. भटजी अनुभव सांगताना म्हणतात "रागाव--ण्यापेक्षा समजावून सांगण्याची पध्दत प्रपंचात जास्त उपयोगी पडते आणि सुखाला तेच साधन आहे"[१०] कोणतीही गोष्ट जो पर्यन्त आपणास मिळत नाही तो पर्यन्त हवीहवीशी वाटते किंवा "दुरुन डोंगर साजरे" या प्रमाणे काही गोष्टी आपणा वाटायला लागतात. तसा अनुभव सुखाबाबत भटजीला आला आहे. भटजी आज सुखी

असूनही, पाहिजे तितका आनंद त्याला मिळत नाही म्हणून ते आपल्या अनुभवातून सांगतात नुसते सुखही कधी आनंददायक नसते असा माझा अनुभव आहे. भूक लागल्याशिवाय अन्नाची गोडी नाही. उन्हात गेल्याशिवाय सावली चे सुख कळत नसते. त्याप्रमाणे गरिबी चांगली भोगल्याशिवाय श्रीमंतीचे सुख कळणे शक्य नव्हे. हा अनुभव माझ्या कुटुंबास येवू चुकला.[११] यातून भटजीची जीवन जगण्याची एक पध्दती आहे. त्यांना कोणत्याही एका चाकोरी पध्दतीने जीवन जगण्याचे आवडत नाही. जीवनामध्ये चढउतार आसावा अशी त्याची आपेक्षा दिसते.

माणूस कितीही दारिद्र्याने गांजलेला असला, विचारी असला तरी, ती मूळ प्रवृत्ती केव्हाना केव्हा जागी होत असते. त्याप्रमाणे भटजीच्या घरातील प्रत्येक व्यक्तीस किंमत आली आहे पण मला मात्र काहीही किंमत नाही. मी दरिद्र्य ते दरिद्रीच आहे असे सांगताना ते विनोदाने आपल्या पत्नीला म्हणतात काय ग तू आईसाहेब बनलीस, बगडी ताईसाहेब झाल्या, बाळ्या बाळासाहेब बनले आणि मी एकटाच काय तो त्रिंबकभट तो त्रिंबकभट ![१२] यात भटजीचा उपरोध तर लक्षात येतोच पण गतकाळातील जगलेल्या दरिद्री जीवनाचीही आठवण होते. भटजी मोठा मुलगा कर्ता झाल्यापासून सुखी होतात. पूर्वीसारखी काळजी नव्हती. मुलगा महिन्याच्या महिन्याला पगार आणून देत होता. त्यामुळे भटजीला कटकट व दगदग नव्हती. घरामध्ये काय चालले आहे याकडे बारीक लक्ष देणे गरजेचे वाटले नाही. पण एके दिवशी अचानक भटजीची पत्नी काशीस जाण्याची इच्छा बोलून दाखविते. यातून भटजी घरातील अंतरिक संघर्ष कसा निर्माण होतो, निवांत वेळी नाही त्या गोष्टी कशा सुचतात, पारंपारिक दृष्टीने अन्नपूर्णाबाई बाळ्याच्या संसाराकडे कसे पहातात आणि दुःखी होतात. त्याचा परिणाम भटजीवर झाल्याने संताप कसा येतो आणि मागिल जगलेले जीवन कसे आठवायला लागते इ. गोष्टी सांगुन पैशाला कसे जगात महत्व आहे, अनुभव, शांतपणा, सज्जनपणा यातील कशाचीही मात्तबरी पैसापुढे नाही ते स्वनुभवाने सांगताना दिसतात. आता कुठेतरी सुखी आहोत असे वाटत असतानाच अचानक आवडीचा नवरा कैलासवासी झाल्याची तार येते. भटजीच्या कुटुंबावर शोककळा पसरते सुख पहाता जवापाडे, दुःख पर्वताएवढे हे विचार भटजीला पटायला लागतात

भटजी काही ठिकाणी एखादा प्रसंग सांगतात आणि त्यावर भाष्य करतात.

ही त्याची निवेदन शैली आहे.कोणताही व्यक्ती पूर्वविचार करतो आणि त्या प्रमाणे वागण्याचे ठरवितो.मात्र प्रत्येक्षात तसा तो वागत नाही.किंवा एखादी गोष्ट आचरणात आणत नाही.तीच अवस्था भटजीची झाली आहे. मुलगा आता घर सांभाळतो आहे तेव्हा आपण ईश्वर नामस्मरणाशिवाय क्षण जावू घावयाचा नाही असा निर्धार भटजी करतात.पण परिस्थिती सुधारली असल्याने बळजबरीने ते मन ईश्वर नामस्मरणात गुंतविण्याचा प्रयत्न करतात.त्यात त्यांना समाधान मिळत नाही.

भटजीचे आणखी एक विशेष आपणास यात दिसते ते म्हणजे त्याचे स्व:ताहाचे आत्मपरिक्षण होय. भटजी स्व:ताहाचे आत्मपरिक्षण करतात.त्याच्या चुका त्यांना जागवितात,त्या सुधारण्याचा प्रयत्न करतात आणि तसा उपदेश ते इतरांना करताना दिसतात.असे भटजी काही दिवस सुख समाधानात असतात.अशात एक प्रसंग त्यांच्यावर येतो तो म्हणजे गोपाळचे ख्रिस्ती धर्मात प्रवेश.या प्रसंगाने भटजी व अन्नपूर्णाबाई पूर्णपणे खचून जातात. स्व:ताहा पुण्याला पाद्रीच्या घरी गोपाळकडे जावून शिव्याशाप देतात. गोपाळला समजविण्याचा,रागविण्याचा, विनविण्याचा प्रयत्न करतात पण त्याचा गोपाळवर काही एक परिणाम होत नाही त्यामुळे आई व वडिल म्हणून जी काही दु:खद अवस्था होते त्याचे वर्णन भटजी करतात. गोपाळ व पाद्रीसाहेबाला भटजी व अन्नपूर्णाबाई जे काही बोलतात , शिव्याशाप देतात त्यातून हिंदू धर्माविषयीचा अभिमान व त्याची आचार-विचारसरणी प्रगट होते. गोपाळ आपल्या कुळाला,ब्राह्मण जातीला बट्टा लावला म्हणून भटजी पूर्णपणे खचून जातात. यमराजाला नेण्याविषयी प्रार्थना करतात . आणि म्हणतात " स्वधर्मात मरण बरे पण परधर्मातील मोक्ष नको "

गोपाळ ख्रिस्तीधर्मात प्रवेश केल्यामुळे भटजी खचून गेले होते.पूर्वीप्रमाणे कुणात बसत नसतं,उठत नसतं,कुणाशी जास्त बोलत नसें.अशा दु:खी अवस्थेत असताना त्याचा जुना मित्र महातपस्वी कर्मठ ब्राह्मण येतो.आपले दु:ख सांगून रडायला लागतो. सोमदीक्षित काशीकर याचे दु:ख पाहुन भटजीना आपले दु:ख " डोंगरापुढे राई " असे वाटायला लागते.त्यामुळे त्यांच्या वागण्यात फरक पडतो. भटजी ही वेळ मिळताच आपले दु:ख सोमदीक्षिताला सांगतात कारण सोमदीक्षिताचे दु:ख

पाहून आपणावर जसा परिणाम झाला तसा आपले दु:ख पाहून सोमदीक्षितही जास्त दु:खी होऊ नये ही भटजीची अपेक्षा आहे. यातूनही भटजीच्या विचारी व समंजस व्यक्तीमत्वाची ओळख पटते.आपल्या संसारातील प्रसंगाची आठवण काढून दु:खी होणाऱ्या भटजी ना नातू झाला ही बातमी समजताच भटजी सर्वकाही विसरुन परत संसारात रममाण होतात. नातू झाल्याचा आनंद त्यांना होतो. प्रपंच खोटा,एकंदर मायेचा पसारा,दु:खा शिवाय येथे कशाची सिध्दी नाही,मनुष्य जीवन फक्त दु:ख भोगण्यासाठी हा गोष्टी भटजीना खरे वाटेनासे झाले. बाळ्या आता मोठा अधिकारी झाला,त्यामुळे पैशाला काही कमी नाही,अन्नपूर्णाबाईला तर बाळ्या म्हणजे परब्रह्म-विष्णू सारखा वाटायला लागला. भटजीचे वय ७० वर्षे झाले. शक्ती उरली नाही पण संसाराची ओढ अगदी तरुणीबांड आहे. या गोष्टीचा विचार भटजी करु लागतात.

'वाईकर भटजी' या कादंबरी मध्ये निवेदक,स्व:ताहा भटजी असल्याने अतिशय स्पष्टपणे निवेदन केले आहे. आपल्या वरील ,आपल्या पत्नीवरील आलेले प्रसंग आणि त्याबाबत मनात निर्माणहोणारे विचार आणि त्यावर भाष्य अतिशय समर्थपणे त्याची लेखनी करताना दिसते. त्यातून भटजीच्या आचार - विचाराची व जीवनपध्दतीची कल्पना तर येतेच पण एक कर्ता पुरुष म्हणून संसार करताना त्या व्यक्तींना कशा प्रकारच्या प्रसंगाला सामोरे जावे लागते ते भटजीच्या रुपातून आपण या कादंबरीत पाहू शकतो.

२) <u>अन्नपूर्णाबाई</u> --

'वाईकर भटजी' मध्ये दुसरे महत्वाचे पात्र म्हणजे अन्नपूर्णाबाई यांचे आहे. वाईकर भटजी यांची पत्नी. वाईकर भटजीनी या कादंबरीत आपल्या जीवनाची कहाणी सांगितली आहे. त्या वाटचालीत अन्नपूर्णाबाईचा बराच वाटा आहे असे त्यांच्या एकंदरीत जीवनातून दिसते. कादंबरीच्या पहिल्या प्रकरणात त्रिंबकभटजी आपल्या पत्नीविषयी वर्णन करतात.त्यातून अन्नपूर्णाबाईची व्यक्तीरेखा आपणा डोळ्यासमोर उभी रहाते.त्यामधून मध्यमवर्गीय ब्राह्मण समाजातील स्त्री ची आठवण आपणास होते.अन्नपूर्णाबाई पूर्ण विचारी व समंजस आहेत,त्यामुळे भटजीची

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

त्यांच्या बद्दल आदराची आणि प्रेमाची भावना आहे. म्हणून ते म्हणतात " दोन्ही वेळा साधा पण मिष्ट व स्वच्छ स्वंयपाक, पोराबाळाची चांगली खबरदारी, आल्या-गेल्या पाहुण्याचा नीट व व्यवस्थित आदर सत्कार, गरिबी प्रपंचात टापटिपीने व काटकसरीचा खर्च, शेजा-यापाजा-याचे वैभव पाहून त्याप्रमाणे आपण ही वागावे किंवा असावे असल्या वेडसर व त्रासदायक समजूतीचा अभाव, इत्यादीमुळे तिजविषयीचे माझे प्रेम जास्त जास्तच वाढत असे."[१३] यावरुन अन्नपूर्णाबाई या परिस्थितीप्रमाणे वागणा-या आणि पूर्ण समंजस अशा असल्याचे जाणवतात. एवढेच नव्हे तर आहे त्या संसारात सुख मानणा-या आणि भटजीच्या दारिद्र्य संसारास हातभार लावणा-या अशा आहेत. त्यांना आपल्या दारिद्र्य संसाराची पूर्ण जाणिव आहे पण आपल्या पतीला जो काही त्रास होतो तो जाणवू नये म्हणून स्व:ताहा सतत हासतमुख असतं म्हणून भटजी म्हणतात" तिची ती सुप्रसन्न मुद्रा, ते गृहदाक्षिण्य व साधारण सुजाणपणा ही माझ्या एकंदर प्रपंच सुखाची मुख्य साधने "[१४] यामधून अन्नपूर्णाबाई याचे व्यक्तिमत्व अधिक गडद व परिणामकारक झाले आहे. इतर स्त्री प्रमाणे याच्याही काही इच्छा आहेत. आवडीचे लग्न झाले त्यात ते समाधानी आहेत. आपल्या मोठया मुलाचे लग्न भटजीने लवकर करावे आणि मग शिक्षणाला पुण्याला पाठवावे अशी त्याची इच्छा भटजीला ते बोलून दाखवितात. मुलाचे लग्न ठरते. तेव्हा कोणात्याही मुलाच्या आईला वाटावे तसे वरमाय होऊन त्या मिरविताना दिसतात, मानपान घेताना दिसतात. पुण्याच्या नविन वातावरणा जाण्यास उत्सुक दिसतात.

वाई सोडून पुण्यास जाण्याचे निश्चित झाल्यावर अन्नपूर्णाबाई पुढील पुण्याच्या जीवनाची दृष्टी समोर ठेवून घरातील ज्या काही बारीक सारीक वस्तू असतील त्या घेतात. कारण आपली परिस्थिती साधारण असल्याने आपणास लगेच काही पैसे देवून घेणे परवडणारे नाही, या गोष्टीची त्यांना जाणिव आहे. यातून अन्नपूर्णाबाई याचे व्यवहारदक्ष व्यक्तीमत्व डोळ्यासमोर येते. अन्नपूर्णाबाई व्याह्याच्या घरी जातात. तेव्हा आपल्या सुनेला घेवून जाताना, त्याची विहिण, राधाबाई यांना होणारे दु:ख पाहुन अन्नपूर्णाबाई त्यांना समजावतात व काळजी करु नये असा विश्वास देतात, त्यातून त्यांच्यातील माणूस आपणा समोर उभा राहातो आणि त्याचे व्यक्तिमत्व गडद होते.

अन्नपूर्णाबाई सोडून पुण्यास येतात.तेव्हा तेथील वातावरणाचा त्यांच्याव चांगला परिणाम होतो.पुण्याच्या संस्कारीत व आधुनिक वातावरणात ते रमण्याचा प्रयत्न करतात. वाईला असताना ते भटजीची होणारी अर्थिक ओढाताण याबाबत काळजी करताना दिसत होते. पुण्यास आल्यावर मात्र आपणाही मुलाबाळासह चांगले रहावे,चारचौधीसारखे दिसावे या भावनेने भटीच्या आर्थिक ओढाताणीकडे दुर्लक्ष केलेले दिसतात. इथे अन्नपूर्णाबाई या सर्वसामान्य स्त्री प्रमाणेच जाणवतात. एवढेच नव्हे तर त्यांनी जे काही आपल्या मुलाच्या विटाळाबाबत भटजीना बोलून दाखविता त्यातून त्या प्रतिगामी विचाराच्या असल्याचे दिसतात. मोरोबा भटजीचो परिस्थिती पाहून जेव्हा कर्ज घेण्याचा उपाय सुचवितात तेव्हा त्याला मात्र अन्नपूर्णा बाई राजी असल्याचे दिसतात. यजमान बाळासाहेब याचे स्थळ सुध्दा आपल्या मुली-साठी चांगले असल्याचे ते भटजीस बोलून दाखवितात, त्याची स्तूती करतात पण भटजीपुढे,पतीपुढे काही चालत नसल्यामुळे त्या गप्प बसतात.भटजी करतील त्या गोष्टीला मान्यता देत राहतात. यातून अन्नपूर्णाबाई पतिनिष्ठ असल्याचे दिसतात.

अन्नपूर्णाबाई यांना संसाराची होणारी ओढाताण याची जाणीव असल्याने त्याचा परिणाम आपल्या पतीवर होतो आहे असे जेव्हा जाणवायला लागते तेव्हा ते प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे पतीची काळजी करताना दिसतात. यातून भटजीना धीर यायला लागतो.मोरोबा आणि भटजी याच्या बोलण्यातून एखादी गोष्ट विकोपाला जाते तेव्हा तो प्रसंग टाळण्यासाठी मोरोबाला त्या म्हणतात " जाऊ द्या की हो,भावोजी. तुम्ही आता उगीच बसा न कसे ! आजच काही जेवंल नाही ना ? जाऊद्या बसा आपले उगीच ! सध्या रागाची वेळ आहे"[१५] यातून अन्नपूर्णाबाईंना भटजीच्या व्यक्तीमत्वाची पूर्ण ओळख झालेली आहे असे दिसते. भटजीच्या स्वभावानुसार त्यांना कोणत्यावेळी कोणत्या गोष्टी बोलावयाच्या, जेणे करुन त्यातून संघर्ष निर्माण होणार नाही.भटजीना त्रास होणार नाही, याची पूर्ण कल्पना त्यांना आहे.त्याप्रमाणे ते वरील उद्‌गारातून मोरोबाना सांगण्याचा प्रयत्न करतात. यातून अन्नपूर्णाबाईच्या परिपूर्ण व व्यापक दृष्टीची जाणिव होते.

मटजी काही काही वेळा विनाकारण संतापतात. आपल्या संसारामध्ये अत्यंत विवंचना आहेत ते सोडविताना त्यांना नाकी नऊ येते आहे.याची जाणिव अन्नपूर्णाबाईंना आहे . म्हणून काही वेळा मटजीकडे चूक असून सुध्दा ती चूक आपल्या पोटात घालण्याचा प्रयत्न करतात. किंवा इतर स्त्रीया प्रमाणे तो राग सहन न झाल्यास आपल्या मुलावर काढतात,कि जेणे करून काही न म्हणता आपल्या पतीला ती चूक लक्षात यावी.मटजीच्या दारी बैरागी येतो. तेव्हा अन्नपूर्णाबाई भिक्षा वाढतात. मटजी भिक्षा वाढल्याबद्दल अन्नपूर्णाबाईंना बोलतात.तेव्हा अन्नपूर्णाबाईंचे जे उद्गार आहेत ते पूर्णपणे आशावादी आणि पारंपारिक संस्काकाराने घडलेले आहेत ते म्हणतात" कोणात्या वेळी कोणात्या वेषाने ईश्वर येत असतो याचा काही नेम आहे ? विन्मुख कोणाला करणे चांगले नव्हे,म्हणून चार दाणे ठेविले, त्यात बाई इतके ते काय गैर झाले ? असे करणे चांगले नव्हे, ही वासना नसावी बरे का !"[१६] यातून अन्नपूर्णाबाईंची व्यापक व सहृदय दृष्टी व्यक्त होते. त्या आपणास जेवढे काही कळते ते ते, त्या त्या प्रसंगानुसार मटजीना सौम्यपणे सांगण्याचा प्रयत्न करतात. आहे त्या परिस्थितीत मटजीची सहचारणी म्हणून राहातात. स्त्री स्वभावाप्रमाणे बाळ्याला स्कॉलर-शिप मिळाली,बगडीला मनात नव्हते तसे चांगले स्थळ मिळाले यामुळे ते आनंदाने हुरळून जातात. आणि ती गोष्ट मटजीना सांगण्यासाठी उताविळ होतात. बाळासाहेब याला नोकरी लागल्याने मटजी कुटूंबाला चांगले दिवस येतात.अन्नपूर्णा--बाईनाही आता पर्यन्तच्या कष्टाचे,दारिद्र्य जीवन जगल्याचे चीज झाले असे वाटते. त्यातून ते सुखी जीवन जगत असतात.कोणात्याही कुटूंबात हेवेदावे असतात त्याप्रमाणे मटजीच्या कुटूंबात देखील आहेत. अन्नपूर्णाबाई याची दृष्टी पारंपारिक आणि जुन्या विचारसरणीची आहे.त्यातून ते बाळासाहेब आणि त्याची पत्नी याच्याकडे पहातात.त्यामध्ये त्यांना आपला कमीपणा व अपमान जाणवतो.ते दु:खी होतात.मटजीकडे मुलगा व सून याच्या वागणुकीबद्दल ग-हाणी घालतात.इथे मात्र इतर स्त्रीयापेक्षा अन्नपूर्णाबाई वेगळ्या वाटत नाहीत.पारंपारिक जीवन जगणा-या,मानपान माणणा-या अशाच दिसतात.

मटजी आणि अन्नपूर्णाबाई आपला बाळ्या कतीसवरता झाल्यापासून

सुख समाधानात रहात असतात. अन्नपूर्णाबाई ही आता ईश्वर भजनात रमू पहातात.त्यासाठी त्या आणि भटजी वाईस येतात. काही दिवस वाईत रमतात. अशात एक प्रसंग येतो तो म्हणजे गोपाळचा ख्रिस्ती धर्मात प्रवेश होय. ही बातमी ऐकून त्या पूर्णपणे खचून जातात. पुण्याला जावून गोपाळची विनवणी करतात. पाद्रीसाहेबाला शिव्याशाप देतात. गोपाळला आई-वडिलाची दु:खाची जाणिव करुन देतात,रागावतात पण गोपाळवर त्याचा काही परिणाम होत नाही.तेव्हा मात्र माझ्या पोटी माझा शत्रू जन्माला आला असे बोलून दाखवितात.यातून त्यांच्या दु:खाची जाणिव तर होतेच पण त्यातून धर्माबद्दलची आचारविचाराची, स्त्री संवेदनशील जाणिवेची,भावनेची कल्पना येते. या प्रसंगाचा त्यांच्यावर इतका परिणाम होतो की,त्या अन्न सोडतात कृश होत जातात,यातच त्याचा अंत होतो की काय याची शंका यायला लागते अशा अवस्थेत असताना भटजीचा मित्र सोमदीक्षित येतो आणि आपले दु:ख सांगतो.त्यावेळी त्याचे दु:ख पाहून अन्नपूर्णाबाई आपण कसे सुखी,शहाणे,लौकिकवाण आहोत असे दिखाऊपणा दाखविण्याचा प्रयत्न करतात.सोमदीक्षित ४-८ दिवस राहिल्याने आपल्या सर्व गोष्टी त्यांना समजत आहेत याची कल्पना आल्यावर त्या स्व:ताहाहुन सर्व काही दु:खाचे च-हाट त्यांना सांगायला लागतात.त्यातून दु:खी बनतात.एवढयात नातू झाल्याची आनंदाची बातमी येते.त्या आनंदी होतात.मागिल सर्व दु:ख विसरुन परत संसारात रममाण होतात.

३) <u>मोरोबा</u> --

मोरोबा हे व्यक्तिचित्र कादंबरीच्या दुस-या प्रकरणापासून नजरेस येते. प्रथम मोरोबा भटजीच्या घरी पाहुणा आल्यासारखा येतो.तो पुण्याच्या एकंदरीत परिस्थितीबद्दल आणि शिक्षणाबद्दल भटजीना बरीच माहिती देतो.मोरोबाला भटजीच्या एकंदर परिस्थितीबद्दल माहिती आहे.तो भटजीच्या सहवासात सतत राहात वेळप्रसंगी भटजीना तो मदत करीत असतो.पुढे तो भटजीचा विश्वास संपादन करतो. मोरोबा भटजीना जवळचा वाटायला लागतो.तो विश्वासातला परम स्नेही होतो. भटजीचा संसार म्हणजे आपला संसार असे समजून लहानसहान गोष्टीची मदत करीत असतो. त्यामुळे भटजी आपल्या संसारातील विवंचना त्याला सांगत असतो,आणि

दोघाच्या विचाराने मार्ग काढीत असतात.

मोरोबा मटजीचे एक जवळचे व जीवलग मित्र म्हणून वावरताना दिसतो. वाई सोडून पुण्याला जावयाचे निश्चित झाल्यावर तो पुढील सर्व गोष्टी पुढे होऊन करतो. सामानाची अवराआवर करण्यापासून ते बैलगाडी आणेपर्यन्त ,कसल्याही प्रकारचे उपकाराची भावना न ठेवता काम करीत असतो. म्हणून अन्नपूर्णाबाई सुध्दा ज्या गोष्टी मटजीना सांगायला भितात,त्या.भावोजी म्हणून मोरोबाना सांगताना दिसतात. यातून मोरोबाच्या व्यक्तिमत्वाची उकल आपल्या लक्षात येते. अन्नपूर्णाबाई जेव्हा मोरोबाला बाजीरावाबद्दल माहिती विचारतात तेव्हा मोरोबाने बाजीरावची जी स्तूती केली आहे त्यामधून मोरोबाची बाजीराव विषयीची व ब्राह्मणाविषयीची विचारसरणी लक्षात येते.मोरोबा हा पुण्यास यजमानाच्या घरी राहतो.त्याला स्व:ताहाला पोर ना बाळ नसल्याने, यजमानाच्या घरी चार कामे करावी आणि आनंदाने त्यांच्या घरी राहावे हा त्याचा संसार आहे. फार तर वेळ मिळाल्यास मटजीच्या घरी येवून यजमानाची स्तूती,वैभव,स्वभाव इ. चर्चा करावी .मोरोबाना मटजीची परिस्थिती माहित असल्याने तो त्याना मदत करतो. यजमान बाळासाहेब नेने याच्याकडून कर्ज काढून देतो.पण पुढे त्याच्या बोलण्याने यामध्ये काहीतरी मतलब आहे असे मटजीला जाणवते ते खरे ठरते.बाळासाहेब नेने विदूर असतात. त्याना दुसरे लग्न करावयाचे असते.ती गोष्ट ते मोरोबाच्या कानावर घालतात.तेव्हा मोरोबा मटजीची मुलगी बगडी हिच्यासाठी बाळासाहेबाचे स्थळ आणतो. ते स्थळ मटजीना पसंद पडत नाही.मटजी संतापून मोरोबाला बोलतात तेव्हा मोरोबा म्हणतो ` हुंडा देखील यावयास नको म्हणून.मी आपले तुम्हास स्थळ दाखवून दिले.सर्व गोष्टी एके ठिकाणी मिळणार कशा'[१७] यातून मात्र मोरोबाची काही स्वार्थी वा विकृत दृष्टी आहे असे मात्र आपणास म्हणता येत नाही.तो मटजीच्या परिस्थिती नुसारच उपाय सुचवितो असे म्हणता येईल.

मटजी वेळप्रसंगी मोरोबावरती रागावत असले तरी,त्यांना इतरांपेक्षा मोरोबा जवळचा वाटतो. ' मोरोबा म्हणजे परब्रह्म वाटे.मोरोबा श्रीमंत नव्हता, किंवा म्हणण्यासारखी उच्च स्थितीतील राहाणी नसे ,विद्या ,किर्ति,द्रव्य या

तिन्ही पैकी कोणताच मोरोबास पाठिंबा नव्हता".[१८] मटजीचा मोरोबा विषयीचा स्नेह निरपेक्ष होता.मटजीचा त्याला उपयोग नाही आणि त्याचा मोरोबाला नाही. उगीच जिवाला एक विसाव्याची जागा म्हणून ते एकमेकाना प्रिय समजत होते.मोरोबा ही कधी मटजीकडून सहेतूक मैत्री केली नाही. मित्र म्हणून त्यानी मटजीला वेळोवेळी ,आडीअडचणीला मदतच केली.मोरोबा आणि मटजी यांच्या संवादातून मोरोबाचे मन उकलत जाते. तो म्हणतो" तुम्हाला वाटते मी सुखी आणि मला वाटते तुम्ही सुखी,जगाचा असा हा क्रमच आहे."[१९] यामधून मोरोबाच्या मनातील संसाराबद्दलची आसक्ती जाणविते. आणि आपणास मटजीप्रमाणे संसार करता आला नाही, याबद्दलची खंतही त्याना वाटत असावी असे वाटते. येथे मटजीला देणारी मोरोबाच्या मदतीची खरी ओळख होते.

४) <u>बाळासाहेब नेने --</u>

" वाईकर मटजी " या कादंबरीमध्ये मटजीचा जवळचा मित्र म्हणून मोरोबा वावरताना दिसतो.वाईहून पुण्यास आल्यावर ही कशा प्रकारची अर्थिक ओढाताण होते आहे हे मटजी मोरोबाला बोलून दाखवितात.तेव्हा मोरोबा त्यांना आपली परिस्थिती सुधारे पर्यन्त,बाळ्याला नोकरी लागे पर्यन्त थोडे कर्जबाजारी झाले तर काय हरकत आहे असा सल्ला देतो.आपण कर्ज घ्यावे,मी माझ्या यजमानाकडून कर्ज देतो ते श्रीमंत व चांगले आहेत असे मोरोबा मटजीस सांगतो इथून बाळासाहेब नेने च्या व्यक्तिचित्रणास सुरुवात होते.

बाळासाहेब नेने हा सावकार आहे अगदी चांगला गृहस्त आहे, पुण्याला आहे. पण तो विदुरावस्थेत आहे.तो श्रीमंत खरा पण सद्गुणी व समंजस आहे. आणि त्याचे घराणे ही बालबोध आहे.पण वय चाळीशीच्या घरातले आहे.बाळासाहेबाला दुसरे लग्न करावयाचे असते. तसे तो मोरोबाला बोलूनही दाखवितो.आणि त्यासाठी स्थळ पहाण्याचे सुचवितो.मोरोबाही त्याच शोधात असतो. अन्नपूर्णाबाईच्या बोलण्यातून बाळासाहेबचे व्यक्तिचित्र काही प्रमाणात लक्षात येते.त्या म्हणतात " हं हं बाळासाहेब तुमचे यजमानच की नाही ? आमची ठगी परवा आदितवारी कुवार गेली होती.एक चवली दक्षिणा,आणि इतकाल्या काढाचा खण दिला तिला, चांगला गृहस्थ आहे बिचारा"[२०] तेव्हा याला पुष्टी देण्यासाठी मोरोबा म्हणतात

तो आहेच तसा पुरुष, गुणवान काय,श्रीमंती काय,रितीमातीत काय,काही विचारु नये अशी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे स्तूतीही करतो.मटजीला पैशाची गरज भासते.मोरोबा करवी नेने कडून मटजी कर्ज घेतात.१५ रुपये चे कर्ज वाढत जाऊन १०० रुपये पर्यन्त कर्ज होते. तेव्हा बाळासाहेब मटजीला प्रत्यक्ष स्व:ताशा भेटण्यास सांगतात.मटजी खिन्न मनाने त्याच्या घरी जातात. तेथे गेल्यावर मानपान,आदरा- - तिथ्य मात्र मटजीच्या कल्पनेपेक्षाही चांगले होते. या प्रसंगातूनही बाळासाहेबाचे व्यक्तीमत्व आपणास जाणावते.पण त्या बरोबरच ते पुढे म्हणतात' मटजी ! हे घर आपले आहे, लागेल तसा पैसा नेत चला.अनमान नको. फेडण्याची काळजी नको.परस्परात संबंध जडले म्हणजे मग नसते फारशी पर्वा '[२१] या त्याच्या बोलण्यातून मात्र त्याचे मटजीला थावयाच्या कर्जाचा मतलब जाणवायला लागतो. एखादा व्यवहारी धनको जेव्हा एखाद्या ऋणकोला कर्ज देतो,तेव्हा तो त्याच्या घरावर,शेतीवाडीवर लक्ष ठेवून देत असतो. तसेच लक्ष मटजीचे धनको बाळासाहेब याचे आहे. तो सुध्दा मटजीच्या बगी बरोबर लग्न करु पहातो. त्यासाठी तो मोरोबाची मध्यस्ती घालतो.त्याच्या करवी तो मटजीला जवळ करु पहातो पण ही गोष्ट मटजीला रुचत नाही ते सरळ सरळ मोरोबा समोर ' थेरड्या ' असा शब्द - प्रयोग बाळासाहेब नेने साठी वापरतात,त्यातून मोरोबाचे यजमान कसे होते त्याचो आपणास कल्पना येते.

५) <u>गोविंदपंत नेने</u> --

' वाईकर मटजी ' मध्ये गोंविदरावाचे पात्र अचानक येते ते एका निमित्याने. हे व्यक्तिचित्र गौण अशा स्वरुपाचे आहे. वाईकर मटजी आपल्या जीवनाच्या व संसाराच्या विवंचनात पूर्णपणे गढून गेले होते.त्याना संसारातील इतर प्रश्नाप्रमाणे बगडीच्या लग्नाची चिंता लागून राहिलेली होती.अशा या अवस्थेत असताना मटजीना बाळ्याला स्कॉलरशिप मिळाली या वार्तेने मनातून आनंद होतो. घरातही आनंदी वातावरण असते अशा वेळीच हे गोंविदपंत असे का आले ,कशासाठी आले,मोरोबाने संधान बांधले नसेल ना ? अशा आनेक विचारातून गोंविदपंत याचा स्वभाव कसा

प्रकारचा आहे हे मटजी सहज टिपून जातात. त्यातून गोविंदपंताचे चित्र सहज साकार होते. गोविंदपंत हा पु-या कारकुनी बाण्याचा आहे. मटजी सारखा काही भिक्षुक गडी तो नाही. तोंडाला आले ते बोलून मोकळा होणारा, मब्महूया असा तो नाही. आपल्या पोटात काय आहे त्याचा बिलकूल अंत लागू न देता, दुस-याच्या मनातला भावर्थ काढून घेण्यात तो अत्यंत पटाईत, सहज प्रश्न करील दक्षिणेस जावयाचे तर उत्तरेकडे तोंड करील, आपण मात्र जास्त बोलावयाचा नाही पण दुस-याच्या तोंडाल मात्र खळ पडू देणार नाही.[२२] असा स्वभाव गोविंदपंताचा असल्याने हा व्यक्ती काही तरी मध्यस्ती करायला आला आहे ही मटजीची शंका खरी ठरते. रामजीपंत सरंजामे यांच्या करवी गोविंदपंत मटजीची मुलगी बगडी हिला मागणी घालतात. एवढेच नव्हे तर बगडी ही कशी भाग्यवान आणि सुलक्षणी आहे ते, असे काही सांगतात कि, मटजी, आपली मुलगी देण्यास तयार होतो. यातूनही गोविंदपंताचा धूर्तपणा आपणास दिसतो. आणि अन्याबापूने मध्यस्तीचे सोपविलेले काम तो यशस्वी करतो.

६) गोपाळ --

'वाईकर मटजी' यांच्या जीवनाची कहाणी या कादंबरीत आहे. वाईकर मटजी आणि अन्नपूर्णाबाई यांना ५ अपत्ये होती. त्यापैकी गोपाळ हा मटजीचा दुसरा मुलगा आहे. इंग्रजी शिकत असतो. बाळ्याप्रमाणे गोपाळवरही सर्वांचा भरवसा होता. त्याचा तो नशिब काढेल हा विश्वास सर्वांना होता. गोपाळचा विवाह झाला होता. गोपाळ पाद्रीलोकांच्या शाळेत शिकत होता. त्याला रोज ख्रिस्ती बायबल वाचावे लागे. त्याचा कोणी पाद्रीसाहेब त्याला काय गुरळ घातली कोण जाणे त्यातून तो ख्रिस्ती धर्म स्वीकारला. त्याचा बाप्तिस्मा झाला. ख्रिस्ती धर्माचा इतका परिणाम गोपाळवर झाला की, त्याला समजावून सांगण्यासाठी गेलेल्या आई-वडिलांच्या उपदेशाचा, विनवणीचा, विनंतीचा आणि संतापाचा काही परिणाम झाला नाही. उलट तो म्हणतो' बाबा मला दु:ख होते तुम्ही अज्ञानात बुडत आहात, येशू प्रीती आहे, त्याच्या उजेडाने या तुमच्या पोटातला सैतान बाहेर निघो'.[२३] या गोपाळाच्या उद्गारातून तो त्या धर्माशी किती

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

एकरूप झाला होता, याची आपणास कल्पना येते. येशूची विचारसरणी, आहार, आचारविचार तो आचरणात आणत होता. तो पूर्णपणे येशूमय झाला होता. यामुळे इतर व्यक्तिचित्रणापेक्षा हे व्यक्तिचित्रण वेगळे वाटते. आणि तत्कालिन कालात अशा काही धर्मसंस्था धर्मप्रसाराचे कार्य करीत होते याची कल्पना येते.

## समारोप

'वाईकर भटजी' ही धनुर्धारी यांची सामाजिक जीवनदर्शन देणारी कादंबरी आहे. या कादंबरीमध्ये मध्यमवर्गीय ब्राह्मण समाजातील कुटुंबकर्त्या व्यक्तीची जीवन कहाणी सांगितली आहे. ही कहाणी निवेदक आपल्या बरोबर इतर अनेक व्यक्तिचित्राच्या अनुषंगाने आपणा समोर प्रकट करतो. या कादंबरीतील व्यक्ति - चित्रणे चांगली रेखाटली आहेत. कमीत कमी शब्दात व्यक्तिचित्र उभे करण्याचे सामर्थ्य लेखकाच्या लेखणीत आहे. तसेच एखाद्या व्यक्तिचे चित्रण करताना लेखक बाह्य वर्णनापेक्षा त्या व्यक्तीचे मानसिक स्थितीचे निवेदन तो करतो आणि ते व्यक्ती-चित्र आपणासमोर उभे करतो. त्यामध्ये वाईकर भटजी, अन्नपूर्णाबाई, मोरोबा, गोविंदपंत नेने इत्यादि आहेत. ही व्यक्तीचित्रणे मात्र भारतीय संस्कृतीमध्ये वाढलेली आणि संस्कृती जोपासणारी अशी आहेत. भटजीचा स्वभाव प्रामाणिक आणि फटकळ असा आहे. तर अन्नपूर्णाबाई पूर्णपणे पतीनिष्ठ आहेत. मोरोबा भटजीचा जवळचा मित्र आहे. असे त्या त्या अनुषंगाने व्यक्तीचे स्वभावरेखाटन चांगले झाले आहे. त्यातून ती व्यक्ती आपणासमोर जीवंत उभी राहाते. बोलणे, चालणे, वागणे या कृतीतूनही व्यक्तीचित्रन गडद होताना दिसते. तसेच या महत्वाच्या व्यक्तीचित्रणाबरोबरच काही गौण अशा स्वरूपाचे, केवळ प्रसंगाने उल्लेखले जाणारे असे काही व्यक्ती दिसतात त्यामध्ये आवडी, बगडी, बाळ्या उर्फ गोविंद, बजाबा, रामजीपंत इ. पात्राच्या अनुषंगाने कादंबरी आशय शब्दरुप केला आहे.

## " पिराजी पाटील " या कादंबरीतील व्यक्तिचित्रणे --

### १) पिराजी पाटील --

" पिराजी पाटील " ही धनुर्धारी यांनी १९०३ साली प्रसिध्द केलेली मराठी ग्रामीण कादंबरी. लेखकाला या कादंबरीचा नायक पिराजी पाटील " एका स्टेशनवर विशिष्ट परिस्थितीत भेटतो. लेखकाने जिज्ञासा दाखविल्यावरुन आपली सर्व हाकिकत सांगतो. ती हकिकत म्हणजे कादंबरीचे कथानक होय. हे कथानक धनुर्धारीनी अतिशय समर्थपणे आपणासमोर मांडले आहे. त्यामध्ये महत्वाचे पात्र म्हणजे पिराजी पाटील. पिराजी पाटील हाच स्व:ताहा निवेदन करीत असल्याने बारिक-सारीक गोष्टीचे व प्रसंगाचे वर्णन तो करताना दिसतो. त्यातून पाटील याची व्यक्तिरेखा आपणा डोळ्यासमोर उभी राहाते.

" पिराजी पाटील" याचे गाव सोनगाव. त्याचे पूर्ण नाव पिराजी हिराजीराव पाटील. बादशहापासून त्याच्या घराण्यात पाटीलकी चालत आलेली होती. त्याच्या पाटीलकी करण्यात भाऊबंदकी नाही. एक मुलगा, त्याच्या पोटी एक मुलगा असाच वारसा त्याच्या घराण्याला लाभलेला होता. पाटील याचे घराणे मोठे नामांकित शूर शिपाई घराण्यातले म्हणून नावाजलेले होते. पाटील याचे आजोबा याचा एवढा दरारा होता की, हैद्राबादचा नवाब, बिजापूरचा बादशाहा, कर्नाटकचा टिपू चळचळा कापत असत. साहेब लोक टोपी काढून पिराजीच्या आज्या मुजरा करीत असत असा आज्याचा व वडिलांचा वैभवशाली वारसा पिराजीला लाभला होता. पिराजीचे वडिल उंमीर साल होते त्यावर्षी वारले. हिराजीराव मोठे पुण्यवान माणूस होते. त्याच्या मृत्यूनंतर पिराजीच्या जीवनाला उतरती कळा लागली ." वडिल गेले त्यावेळी पाटील याचे वय २५ वर्षाचे होते. घरात आजी, आई, बायको दोन लहान लग्नाच्या बहिणी व त्याचा तान्हा मुलगा अशा त्याच्या घरात जनावरे-चार म्हशी, बैल जोडी १६, गाईचे खिल्लार चाळीस शेपटाचे खोंड आठ, घोडी दोन, शिंगरे तीन , गल्ला घरात शंभर दिडशें खंडीचा. बारदान तीन चार हाजाराचं, गडी १८२०, हक्क, इतमाम सर्व चांगले , कर्ज फुटक्या

कवडीचे नाही. अशा थाटाचा जबरदस्त प्रपंच, शिपाई, प्यादे सेवेत तयार* [२४]

या वरील माहितीवरुन पिराजी पाटील याच्या घराण्याची एकंदरीत कल्पना येते. वर्षानुवर्ष पारंपारिक जीवनपध्दतीने चालत आलेले, गावची पाटीलकी संभाळणारे गावामध्ये श्रीमंत असणारे असे घराणे आपल्या डोळ्यासमोर येते. पिराजी पाटील याचा प्रपंच बहारीचा होता. धनकनकसंपन्न असा प्रपंच होता. घराणाचे नाव चांगले. वडिलांचा लौकिक मोठा होता. घरात दारिद्र्य नाही. अशा घरातील पिराजीला जगाचा असावा तेवढा अनुभव नाही. म्हणूनच की, काय पिराजीच्या वडिलांनी त्याला फार महत्वाचा उपदेश स्व:ताहाच्या अनुभवातून केला होता पण तोच उपदेश पिराजी आधी विसरला आणि त्याच्या जीवनाला वेगळे वळण लागले. त्याचा पिराजीला पश्चाताप झाला. म्हणून तो म्हणतो * वडिलांनी एवढी मिळकत माझ्या स्वाधीन केली, पण नुसती ही उपदेश रत्ने दिली असती म्हणजे त्यांनी दिली ती मी संभाळून ठेवली असती तर माझ्या उरव्याला पारावार नसता* [२५] तो स्व:ताला मोठा मानू लागला. आपण सुखी व धनसंपन्न आहोत असे त्याला वाटू लागले. आज सरा नशिबवान काय तो मीच या भ्रमाने तो घेऊन गेला. त्यामुळे देवाची सुध्दा वर्षानुवर्ष त्याला आठवण होईनाशी झाली असे असले तरी दुर्वर्तनाकडे आणि दुर्व्यसनाकडे त्याचे पाऊल पडले नाही हाच काय तो पिराजी पाटलाचा मोठेपणा.

पिराजीचा पेशाच पाटीलकीचा व वतनदारी घराण्याचा होता, ते गावचे म्होरके होते. घरचा कुणबावा मोठा असल्याने धंद्यातील बहार सर्वांत जास्त होता. त्यामुळे पिराजीची दैनंदिनी कशा प्रकारची होती याची कल्पना त्यानी सांगितलेल्या वर्णनावरुन लक्षात येते. * दोन तास रात्र असतानाच १६ बैल जोडी गळ्यातल्या घंटा घणघण वाजवीत रानाकडे जावयास निघावयाचे. डोक्यावर आडते नाहीतर औताचे सामान. माकरीचे गाठोडे. बैलामागे दहा बारा गडी कामाला जावयास निघत. इकडे बैल रानात गेले की, मोलकरणीनी दळण सुरुवात करावयाचे. जात्याचा घरघर आवाज, जात्याची गाणी ऐकूण जीवाला मोठा आनंद पिराजीला होत असे *[२६] पिराजी पहाटे लवकर उठून तांब्या घेऊन बाहेर पडायचा. शेताकडे जावून सर्व

कामावर जातीने लक्ष धायचा. आणि परत गावच्या चावडीवर बसून गावातील सर्व उठाठेवी, चौकशा, कारभार संभाळीत असे. घरी येवून घरातील दुधदुभत्याच्या जनावरांपासून ते बैलबारदाना पर्यन्त सर्वांची विचारपुस करीत असे. शेताकडून येताना ताजी भाजी, नवा काहीतरी रानमेवा, काही फळे घरी आणित असे, मग थाटाने जेवण करीत असे. जेवण झाल्यावर अर्धा तास झोप घेत असे. पुन्हा पिराजी चावडीवर जात असे ते संध्याकाळपर्यन्त येत नसे.

पिराजी याचे घरानेच शेतकी असल्याने शेतावर जितके त्याचे प्रेम आहे तितकेच प्रेम शेतामध्ये राबणाऱ्या गुरा-ढोरावर, बैलबारदाण्यावर आहे. शेतातून आलेल्या जनावराची विचारपूस करण्यास पिराजी कधी विसरत नाही. प्रत्येक जनावराजवळ जावयाचा, पाठीवरुन हात फिरवीत असे. जनावराना वाचा नाही, बोलता येत नाही हे माहीत असूनही त्याच्याशी बोलायचा "काय ग काशी ? आलीस ? चारापाणी प्यालीस ? सावळ्या, तुला पेंढ, सरकी मिळाली ? गुलामा, आज नांगराच्या कामाने दमलास !"[२७] असे गाई-बैलाला विचारीत असे, त्याच्या गुणाचे कौतुक करीत पाटील दिड-दोन तास गोठयातून फिरत असे. यातून मुक्या प्राण्यावरील त्याचे प्रेम व्यक्त होते. पिराजीला घरामध्ये जनावरे असणे अभिमानाचे वाटते. त्याच्या मते जनावरे म्हणजे खरी दौलत आहे या दौलतीपुढे सारे जग तो तुच्छ मानतो. वासरे, गाई, म्हशी, बैल, घोडी याच्या संपत्ते पुढे जगात दुसरे काही एक नाही. दूध, दही, ताक, लोणी, तूप याच्यासारखे गोड खाणे कोणते ? हा प्रश्न तो विचारतो अशा जनावरांना तुम्ही कितीही राबवा, केव्हाही कामाला लावा, काहीही खायला घाला. पाणी पाजले पाजा, तो कुणासमोरही गऱ्हाणे मांडीत नाही. एवढे असूनही जनावरापासून काही इतके नुकसान नाही. दूध, तुप, शेणखत, वासरे इ. गोष्टी आपणास त्यांना सांभाळल्याच्या बदल्यात मिळत असतात. म्हणून तर गाईला देव मानतात. पण खऱ्या लक्ष्मीचा लोकांना कंटाळा आहे म्हणून तो म्हणतो "जनावरे नाही ते का घर ? स्मशानच ते ! सौभाग्य नाही ती बाई आणि ही जनावरे नाहीत ते घर, सारखेच. ही जनावरे साक्षात अन्नपूर्णा देवी !"[२८] यामधून पिराजीची शेतीविषयी व जनावरांविषयीची विचारसरणी लक्षात येते. मागिल काळात जनावरांना किती महत्व होते याचीही कल्पना आपणास

यावरुन येते. सौभाग्य आणि स्मशान या परस्पर विरोधी शब्दातून जनावरा-बद्दलची महती तो पटवून देताना दिसतो.

ब्राह्मणाला आपण भू देव संत ` म्हणातो,ते पिराजीला मान्य नाही. त्याच्या मते खरे भुदेव ही जनावरे आणि खरे संत हे शेतकरी तो मानतो आणि तसे पटवून देतो.माणसापेक्षाही मुक्या प्राण्यावर,जमिनीवर पिराजीचा जीव आहे. त्याचा तो दाता आहे. पिराजीच्या मते जमिन,त्याची मशागत हा प्रपंचातील मोठा प्रश्न आहे. जमिनीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना तो म्हणातो,जमिन आमची आई,बाप,भाऊ,देव,सरकार आहे. जमिनीची योग्यता कधी कुणाला यावयाची नाही.भूमातेची सेवा कधी कुणाला उपाशी मरु देत नाही.` आई घरात नसली तर एखादे वेळ पत्करेल,पण पदरी जमिन नाही तर या जगात तो फुकट जन्माला आला .डोळे नाहीत तो आंधळा आणि पदरी जमिन नाही तो दुबळा हे सारखेच दुर्दैवी !`[२९] यामधून पिराजीचे भूमातेचे महत्व,श्रध्दा आणि प्रेम व्यक्त होते. प्रत्यक्ष आई पेक्षाही जास्तीचे महत्व तो जमिनीला देताना दिसतो.त्यातून त्याची शेतीविषयी,ग्रामीण जीवनाविषयीची कल्पना व्यक्त होते. शेती व शेतकरी, कुणाबी याच्या शिवाय दूनिया जिवंत राहावयाची नाही,असेही तो आत्म - विश्वासाने सांगताना दिसतो.

पिराजी पाटील पुढे आपले लौकिक जीवन जगताना कशा प्रकारच्या अाडचणी, त्रास होत होता याचे वर्णन करतो. पिराजी परिस्थितीने चांगला असल्याने तो आपल्या आप्ताच्या तावडीत सापडतो.आप्तइष्ट,मामा,मावशी,बहिणा, भाचे,मेहुणे,जावाई इ.प्रत्येकाला आपल्या कुवतेप्रमाणे मदतही करतो.पण कितीही मदत केली तरी कोणीही संतुष्ट दिसत नाही.तर आणखी मदतीची अपेक्षा धरुन चवताळून उठत " दाणे उसणावार द्या,कब्बा शिल्लक नाही,घरात मुले रडतात, गाय पाहिजे,सावकाराने फिर्याद केली,जामीन व्हा,साक्षीदार मिळत नाहीत,ते मिळवून द्या "[३०] अशा प्रकारे रोज एकजण पाठीमागे लागलेला. त्यामुळे कोणाला काही कोणाला काही पिराजी देत असे.पण कशामध्ये तृप्ती म्हणून नाही. हे पाहिल्यावर पिराजीने कुणालाही मदत द्यावयाचे नाही हे निश्चित केले. एवढे करुन

ही त्याची स्वकिय मंडळी त्याला पाण्यात पहात होती.पिराजीचे राहाणे, चालणे,बोलणे आप्तमंडळीना रुचेनासे झाले होते.त्याच्या मागे त्याची निंदा नालस्ती त्याला एकू येत होती.पण पुढे येवून तोंडावर निंदा नालस्ती करण्याचे धाडस कोणात असल्याचे त्याला दिसत नव्हते.केवळ आप्तइष्टच पिराजीला मदत मागून त्रास देत नव्हते तर सरकारी आधिकारी सुध्दा मदत मागून त्याला लुबाडत होते.येणाऱ्या प्रत्येकाची अशी समजूत आहे की," पाटील धड आहेत,लुटा त्याला"[31] म्हणून ते त्याच्याकडे " पाटील जेवायला घाला,पाटील अमुक खायला द्या,तमके मला पाहिजे,असा तगादा लावतात"[32] अशा प्रकारे येणारा प्रत्येक जण आपआपल्या परिने पिराजीला लुटण्याचा प्रयत्न करीत होता.त्यामुळे पिराजी पाटील हैराण झाला होता.त्याला ते परवडेनासे झाले होते.त्याला शेती व्यवसाय करणे आवघड होऊन बसले होते.केळीची बाग तर त्याने शेतातून काढून टाकली.सरकारी लोकांना संभाळता संभाळता त्याच्या नाकी नऊ आले होते पण बाहेर मात्र प्रतिष्ठा वाढू लागली.पाटील सधन आहे. पाटील सरबराई करतो, पाटलाला वाटेल ते काम सांगा तो फत्ते केल्याशिवाय राहाणार नाही असा नावलौकिक सर्वांच्या मुखी झाला.पण प्रत्येक्षात मात्र पिराजी या गोष्टीला कंटाळून गेला होता,त्रस्त झाला होता.पिराजीला खर्च परवडेना तेव्हा त्याने निधास्तपणे गावकऱ्यांकडून लाच खायला सुरुवात केली.पण त्याला समाधान व बरकत कोठून येणार ? उलट सरकारी लोकांकडून लाचेच्या आपेक्षा वाढल्या त्यामुळे पिराजी दाणे फेकून कोंबडी झुंजविण्याच्या कामाला लागला. आणि मिळकत चांगली मिळावी म्हणून धडपड करु लागला. यामुळे त्याच्या हातून लोकांवर रोज जुलुम होऊ लागला.त्यामुळे गावगुंड लोक हाताशी धेणे त्याला भाग पडले. पिराजी कडून अन्याय,पातके,घातपात रोज घडू लागले.गावातील रयत पिराजीवर नाराज होऊ लागली.शिव्याशाप देवू लागली.एकंदरीत पिराजी पाटलाच्या पाटिलकीची मुळे ढिली होत चालली.त्याला कोणीही,काहीही बोलू लागले.कारकून शिपायाचे बोलावणे येवू लागले.त्यामुळे आपण केलेला भ्रष्टाचार बाहेर येतो की काय ? याने पिराजी पूर्णपणे धास्तावून गेला. त्याला अन्नपाणी गोड लागेना.केलेल्या कृत्याबद्दल ,पापाबद्दल पश्च्याताप वाटू लागला.

पिराजीला केलेल्या वाईट कृत्याची जाणिव झाल्याने तो मामा व आपला जुना मित्र गोपाळपंत कुलकर्णी याच्या करवी झालेल्या चुकांची दुरुस्ती करुन घेवू लागतो. कोणी काही तर कोणी काही उगीच अफवा उठवीत असतो. त्यामुळे पिराजीला एकेक दिवस नकोसा वाटू लागला.जीव नको,संसार नको,अफू - खावून मरावे,नाही तर कुठेतरी तोंड काळे करुन जावे असे त्याला वाटत असे.शेवटी दिड महिन्याच्या त्रासानंतर तेराशे रुपये लाच चारुन तो आपल्यावरील आरोप दडपून टाकतो. त्रासातून एकदाचा मोकळा होतो. या कामी मामा,गोपाळपंत,आई, पत्नी इ. नी मदत केल्याची जाणिव मात्र पिराजीला आहे.तसे तो बोलूनही दाखवितो.

/पिराजीची देवधर्मावर श्रध्दा आहे. विश्वास आहे. लक्ष्मी ही त्याच्या पढेरीचे दैवत आहे. तुळजापूरची भवानी ही त्याची कुलस्वामिनी आहे. या देवाच्य कृपेने आपल्यावर आलेले संकट टळले ही त्याची श्रध्दा आहे.म्हणून गाव जेवणाचा आणि संतर्पण करण्याचा समारंभ मोठया आनंदाने तो पार पाडतो.आणि सर्व घरादाराला तुळजापूरच्या देवीच्या दर्शनाला घेवून जाण्याचे तो निश्चित करतो. त्यावेळी पिराजीच्या मनामध्ये आपण अस्से करावयाचे तस्से बघावयाचे,पापे धुऊन टाकायची,नवी वीट ,नवे राज्य निर्माण करायचे,धनदौलत वाढवावी, शेतमळे पिकवायचे असे विचार रोज त्याच्या मनामध्ये राहतात. पिराजी सर्व घरदाराला घेवून तुळजापूरला जावून येतो. तुळजापूर प्रवासात सुभानबा मामाची मुलगी सकवारबाई हिचे दु:ख त्याला समजते.तेव्हा मामांनी आपणावर फार मोठे उपका केले आहेत याची जाणिव पिराजीला असल्याने तो आपल्या उपकाराची परतफेड करावी या हेतूने सकवारबाईला मदत करण्याचे ठरवितो. आणि गढी निंबाजीच्या मदतीने सकवारबाईचा पती संपतराव याला तो प्रयत्नाने घरी आणतो.तेव्हा पिराजीचा आनंद गगनात मावेनासा होतो.

पिराजी आता वाईट कृत्ये करण्याचे सोडून देवून आपला कुणबावा आणि प्रपंच याकडेच लक्ष देवू लागतो. गावात सावकार निर्माण झाल्याने गाव मोडकळी येवू लागला होता. दर वर्षाला दहा पंधरा तरी कुळे सावकाराच्या घरात जायला

लागली होती.गावात अनेक प्रकारचे कटकारस्थान रचले जावू लागले होते.पण पिराजी यातून अलिप्त राहात होता असे असताना तुंगी मोलकरनीच्या मृत्यूचा संशय घेवून पिराजीला संकटात टाकण्याचा प्रयत्न केला जातो.तेव्हा त्याचा मित्र गोपाळपंत याच्या सल्ल्यावरुन तो प्रसंग टळतो. तसेच गोठयाच्या पश्चिमेकडील भिंत एकाएकी ढासळते तेव्हा त्याचे बांधकाम पिराजी चालू करतो.विनाकारण चुकिचा आरोप करुन त्याचे बांधकाम थांबविण्यात येते.एकंदरीत पिराजीच्या गावची स्थिती पूर्णपणे गढूळ झालेली होती. प्रत्येक जण एकमेकाला स्वार्थासाठी पाण्यात पहात होता.

जेष्ठाचा महिना आला.मृग नक्षत्र लागले. पावसाचा पत्ता नाही.नुसते वारे वाहू लागले.लोक हवालदिल झाले. सर्व नक्षत्रे कोरडे जावू लागली.जनावरांचा चाऱ्याचा प्रश्न निर्माण झाला. एकंदरीत पिराजीच्या गावावर सर्वत्र दुष्काळाची छाया पसरली.दुष्काळाचा कहर सुरु झाला हे पिराजीला व त्याच्या आईला पटेनासे झाले. शेताबद्दल,मालमत्तेबद्दल आणि गावाबद्दल काळजी वाटू लागली. लोकांचे हाल पहावेना झाले.यासाठी आईच्या सल्ल्याने पिराजीने उदार मनाने दिड-एक खंडी दाणा व पंचवीस-तीस हजार कब्बा लोकांना उसनवार दिला. गावाला दोन तीन महिने सांभाळून धरले.आपल्या जवळ जे असेल ते ते त्याने गोरगरिबाला दिले. पिराजीच्या आईलाही ही परिस्थिती पाहावेनाशी झाली. सात पिढ्या आपण या गावचे पाटील आहोत.गावची रयत म्हणजे आपली लेकरे बाळे आहेत.त्याना उपाशीतापाशी टाकावे आणि आपण जेवावे हे काही बरे नाही. सर्व गावातील जनावरे आणि लोक आपल्या घरचे समजा आणि उद्यापासून सर्वांना दाणा पोच करा.हा आईचा सल्ला पिराजीला मनापासून आवडतो.तो आपल्या गड्या करवी गावातील सर्व लोकांना बोलावणे पाठवितो.अंगणात तीन कणगी जोंधळ्याचे दाणे ओतून सर्व लोकाना त्याचे वाटप करतो.त्याचे वर्णन असे" घरटीला पाच पाच पायली दाणे,हजार हजार कब्बा,उसनवार की धर्मदाय म्हणून दिला. दर आठवड्याला एक दिवशी दाणे व कब्बा असा सर्वांस मोजून देण्याचा आमचा क्रम चालला. "[३३] यातून त्याची माणूसकी दिसून येते.त्या बरोबरच त्याचे गावावरील प्रेम आणि या लोकांच्या जीवावरच सात पिढ्या

पाटीलकी संभाळली याची जाणिव त्याला असल्याचे दिसून येते.

दुष्काळाच्या काळात पाटील अन्न देतो आहे. जनावरांना चारा देतो आहे हे पाहून गावातील लोक आनंदी होतात. पिराजीला धन्यवाद देतात. पिराजी त्यांना एखाद्या देवासारखा वाटू लागतो. पिराजी आपणावर उपकार करतो आहे अशी भावना लोकांची होऊ लागते. आणि त्या उपकाराची परतफेड म्हणून लोक स्वमनाने येऊन पिराजीच्या शेतामध्ये कष्ट करु लागतात. पिराजी नको म्हटले तरी कोणीही ऐकत नाहीत. यामुळे पिराजी मनातून समाधानी आणि आनंदी होतो.

पिराजी पाटील याला आपण या गावचे पाटील आहोत . गावातील प्रमुख व्यक्ती आहोत. गावाला संभाळणे हे आपले कर्तव्य आहे याची जाणिव असल्याने तो त्यांना आपल्या ऐपतीप्रमाणे संभाळण्याचा प्रयत्न करतो. सरकारची दुष्काळाची कामे निघाली तेव्हा आसपास खेड्यातील लोक कामाला जात होते. पिराजीने गावातील लोकांना दुष्काळी कामाला जावू दिले नाही. गावामध्येच काम काढून गावातील लोकांना संभाळण्याचा प्रयत्न करीत होता हे पाहून आसपासच्या गावातील लोक म्हणू लागले " आम्ही पिराजी पाटलांच्या गावचे तरी रयत का नाही झालो ? "[34] यामधून पिराजी पाटीलच्या कर्तृत्वाची तर ओळख होतेच पण त्यातून त्याचे गावातील लोकांवरील प्रेम दिसून येते. आपल्या संसारिक जीवनाचा फारसा विचार न करता जेवढी म्हणून आपल्या धनसंपत्तीचा उपयोग गावासाठी करता येईल तेवढा पिराजी करीत होता. पुढील पाऊस पाणी याच्या आशेवर तो गाव सांभाळत राहतो. पुन्हा पावसाने तोंड काळे केले. दुष्काळाणे आक्राळ-विक्राळ रुप धारण केले. त्यामध्ये पिराजीसह पुन्हा गावाला दुष्काळाणे पछाडून काढले. यामुळे मात्र पिराजी पूर्णपणे गांगरुन जातो. त्याचा धीर सुटू लागतो. गावात रोगराई निर्माण होते. प्लेगची साथ येते. त्यामुळे गाव सोडून शेतात जावून राहावे लागते. दर्याबाईची दोन मुले आणि नवरा प्लेगने मरतात. प्लेगमध्ये पिराजीची सगळी मुले मरतात. सकवारबाईच्या दोन्ही मुलास हगवण लागून तीही घरीच मरतात. संपतराव भ्रमिष्टासारखा करु लागतो. या अशा

एकामागोमाग निर्माण होणाऱ्या दु:खाने,संकटाने पिराजी पूर्णपणे वैतागून जातो,गांगरुन जातो.त्यामुळे तो म्हणतो " मला तर काही सुचना आईचे दु:ख पाहू ? का बायकोला वाईट वाटते,त्याची काळजी करु ? का दर्याबाईचे सांत्वन करु ? का सुमानरावचे दु:ख सोसू ? का सक्वारबाईच्या संकटाची काळजी वाहू ? का करु तरी काय ? असे होऊन गेले.एकीकडे दुष्काळाचा कहर,दुसरीकडे प्लेगचा मढीमार व लोकांचे मरण ! माझ्या घरचे बैल गेले,माझा गोठा ओस पडला,घरचा दाणागोठा संपला.याची मनाला हुरहूर असा चोहोकडून संकटानी माझ्या सभोवती गराडा दिला".[35]

या उताऱ्यात पिराजीवर आलेली संकटाची मालीका तर लक्षात येतेच पण त्यातून त्याचा होणारा मानसिक कोंडमारा जाणविल्याशिवाय राहात नाही. एक गाव कर्ता आणि घरकर्ता पाटील म्हणून पिराजीची या ठिकाणी चांगली ओळख होते.या अनंत संकटानी पिराजी पूर्णपणे मार्बावून जातो. त्याला काही सूचेना,पोटात भाकरी जाईनाशी होते. माजंरासारखी धावपळ करावी लागते. नको हा त्रास नको ही दगदग यातून त्याचा स्वभाव चिडखोर बनतो.विष खाऊन प्राण द्यावा इथेपर्यन्त पिराजी विचार करतो.तो तशा प्रकारे आईस बोलून दाखवितो. त्याबद्दल आई त्याला धीर देण्याचा प्रयत्न करते.त्यातून धीर धरुन संकटाशी सामना करायला पिराजी पाटील सिध्द होतो.

प्लेगची साथ संपते.पिराजी गावात राहाण्यास येतो.आणि कुणबावा पाहू लागतो.मळ्यातील विहिरी कोरड्या ठणठणीत पडलेल्या असतात. बागाईत सर्व मोडलेली असते.रानभर दिडसे झाडे वाळून गेलेली असतात.त्यामध्ये पेरु,शिताफळ डाळीब इ.झाडे आहेत.शेतात अशी स्थिती .घरी जावे तर मुले नाहीत म्हणून त्याचा गळा भरुन येतो.गावात लोक नाहीत हे पाहून पिराजीचा जीव कासावीस होत असे.अन्न गोड लागेना.झोप उडून जाते अशा स्थितीत आणखी एक संकट ओढावते ते म्हणजे पिराजीच्या घरावर पडलेला दरोडा.आमस्याची काळी रात्र. रात्रीचे बारा वाजता पिराजीच्या घरावर ५०-६० लोकांचा दरवडा पडतो. जाळपोळ ,आरडाओरड,एकच कल्लोळ माजतो.अशा स्थितीत आईने सहा बारी पिस्तुल दिल्याने पिराजी धैर्याने आलेल्या प्रसंगाला तोंड देवू शकतो.त्यामध्ये

पिराजीचा सोबती दौलत्या जखमी झाल्याचे पाहून पिराजीला वाईट वाटते. त्याचा जीव असल्याचे लक्षात आल्यावर त्याला वाचविण्याचा प्रयत्न करु लागतो. सुदैवाने दौलत्या वाचतो.

पिराजीच्या घरावर दरवडा पडला. नऊ लोक ठार झाले. हे वर्तमान ऐकताच शिपाई, हवालदार, जमादार, इन्स्पेक्टर अधिकारी लोक गावात हजर होता पाटीलने हत्यार चालविले आहे. प्रसंग मोठा कठीण आहे असे कोणी काही कोणी काही म्हणू लागते. त्यामुळे पिराजी गोंगरुन जातो. गोपाळपंताला तो बोलावून घेतो. गोपाळपंत तालुक्याला जावून कलेक्टर साहेबाला बोलावून आणतो. पिराजीची आई घडलेली खरी घटना आणि चालविलेले हत्यार या विषयी माहिती देते. त्या प्रसंगाला धैर्याने सामोरे गेल्याने साहेब आनंदी होतो. आणि म्हणतो "शाबास पाटील, शाबास बाईसाहेब "[३६] यातून साहेबांची अनुकूलता दिसून येते. साहेबांनी दिलेला मोठेपणा आणि धीर ही पिराजीला समाधानकारक वाटतो. दरोड्या - बाबत काही काळजी करु नका, तुम्ही बहादुरी केली. सरकारला मोठा संतोष झाला असे सांगून कुणाला लाच देवू नका, मी याचा बंदोबस्त करतो असा विश्वास साहेबानी दिल्यावर पिराजीला धीर येतो. त्याप्रमाणे तो वागायला सुरुवात करतो. पिराजीच्या अशा प्रामाणिकपणा मुळे पोलीस शिपायांना भ्रष्टाचार करता येत नाही. म्हणून ते गावातील लोकांना तपासाच्या नावाखाली त्रास देवू लागतात. त्यामुळे गावकरी पिराजी पाटलाच्या नावाने खडी फोडतात. यामुळे पिराजी संतापून जातो आणि तपास सोडून घरी निघून जातो. पोलिस त्याच्याबद्द खोटे रिपोर्ट देतात पण मुख्य साहेबांकडून त्याची चौकशी होऊन जमादारास सस्पेंड केले जाते तेव्हा पासून पुन्हा पिराजी पाटलाचा दरारा वाढतो.

सस्पेंड जमादार मात्र या घटनेने पिराजीवर मनामध्ये डूक धरुन राहतो. तो आपल्या मेहुण्या करवी काही दागिने त्याच्या घरात ठेवून पिराजीला अडचणीत आणू पहातो पण पिराजीच्या आईच्या समयसूचकते मुळे हे पिराजीवरचे संकट टळते. साहेब याबाबत पिराजीला धीर देतो.

सावली सारखी सतत पिराजीच्या पाठीमागे राहाणारी पिराजीची आई सोयराबाई हिचा साप चावून मृत्यू होतो. पिराजीवर दुःखाचा डोंगर कोसळतो.

आई म्हणून मी आता कोणाला हाक मारु ? माझी आई मला आता कशी परत मिळेल ? अशा विचाराने तो वेडावून जातो. आपले आई-रुपी कवच गेल्याची जाणिव त्यास होते. आणि वाईट वाटते. आई नंतर साथ देणारा मित्र गोपाळपंत हा ही तापाने आजारी पडून मरण पावतो. पिराजीचा उजवा हात नाहिसा होतो. असे एकापाठोपाठ एक जवळची माणसे नाहिसे होतात हे पाहून पिराजीचा धीर खचायला लागतो.

एके दिवशी गोरा साहेब पिराजीच्या गावी येतो. त्याचे नाव पाद्री-साहेब.पिराजीच्या गावातील दारिद्र्याचा फायदा घेवून तो सर्व सोयी देवून, लोकांना धर्मान्तर करावयास लावतो.' गरिब लोक प्रभू यांच्यावर करुणा कर ' अशी प्रार्थना करतो. हे पाहून धर्माबद्दल अभिमान असणाऱ्या पिराजीला लोकांचा धर्म बाटल्यामुळे काळजी वाटायला लागते. तो विचार करायला लागतो. पाद्रीसाहेब पिराजीच्या गावी येवून आपल्या धर्माचा प्रचार करीत असतो.त्याचा परिणाम म्हणून दौलत्या बाटतो.त्यामुळे पिराजी हातबल होतो. तो राहुरीस दौलत्याकडे जातो. दौलत्या बाटल्याचे ऐकूण पिराजी संतापवतो आणि दौलत्याच्या तोंडात मारतो, शिव्या देतो. कारण विश्वास म्हणून कोठे ठेवता येत नाही याचे पिराजीला वाईट वाटते. त्याच्या कडून दर्याबाईचा पत्ता घेवून तो तिला घरी घेवून येतो.

पिराजी परत गावी येईपर्यन्त मृगाचे दिवस आलेले असतात. पाऊस चांगला पडलेला असतो. खरिपाच्या पेरण्या झालेल्या असतात. पिराजी पाटील आपल्या गावी आपल्या रयतेला सांभाळण्यासाठी पुन्हा कामाला लागतो. मामलेदार, फडणीस,शिरस्तेदार यांच्याकडे जावू कुळाव्याची खरी किंमत काय आहे, हे पटवून देतो. पिराजी पाटील याच्यावर कितीतरी संकटे आली पण तो आपल्या गावा-वरील कार्यामध्ये कमी पडत नाही. म्हणजेच त्याचे गावावर त्या गावातील माणसावर त्याचे प्रेम आहे. म्हणून तर कित्येक वर्षे तो गावचा पाटील असलेला दिसतो या त्याच्या पाटीलकीतच त्याचे कर्तृत्व दिसते.

## सारांश --

' पिराजी पाटील ' हा या कादंबरीचा नायक आहे. गावचा पाटील म्हणून जबाबदार व्यक्ती म्हणून तो गावची काळजी करतो. आपण गावचे पाटील झालो ते या सर्व गोरगरिब व शेतकरी, कष्टकरी यांच्या जीवावर याची त्याला जाणिव आहे, त्यामुळे तो गावावर दुष्काळ पडतो तेव्हा आपल्या स्व:ताहाच्या संसाराचा फारसा विचार न करता उदार मनाने गावाला सांभाळते आपल्या जवळील अन्नधान्य व जनावरांसाठी कडबा याचे तो वाटप करतो. पिराजीला मुक्या जनावरांबद्दल, गावाबद्दल, शेतकऱ्याबद्दल प्रेम आहे. गाव सुधारण्यासाठी तो सतत झटताना दिसतो. अशा त्याच्या कार्यामुळे पिराजीच्या व्यक्तीचित्रणा बरोबर त्याच्या गावातील जीवनदर्शनाची कल्पना येते.

२) सोयराबाई --

' पिराजी पाटील ' हे सोन्नगावचे पाटील आहेत. बादशहाच्या पासून पिराजीच्या घराण्यात पाटीलकी चालत आलेली असते. पिराजीचे वडिल हिराजीराव पाटील हा मोठा पुण्यवान माणूस होता. उदार अंत:करणाचा, कुणालाही सरळ हाताने व मनाने मदत करणारी अशी व्यक्ती होती. त्याच्या पत्नीचे नाव सोयराबाई म्हणजेच पिराजीची आई. ती मोठया घरात व चांगल्या संस्कारात वाढलेली होती. उंदीर साल होते तेव्हा हिराजीराव मरण पावले. पिराजीच्या घरावर संकट कोसळले. सोयराबाई तर अतिशय दु:खी झाल्या. मला अहेवपणी मरण यावे ही त्याची इच्छा असते. पण उलट झाले. हिराजीरावच अगोदर मरण पावले. सहाजिकच सोयराबाई हा त्या कुटुंबाच्या कर्त्या व्यक्ती झाल्या. पिराजीला विश्वासात घेवून आपली आता पर्यन्त पिढ्यान-पिढ्या चालत आलेली पाटीलकी सांभाळू लागल्या. सोयराबाई हा धनकनकसंपन्न अशा कुटुंबात वाढलेल्या असल्या तरी त्यांना गोरगरिबांविषयी व मुक्या प्राण्याविषयी आपुलकी आहे. पती निधनानंतर मोठया जिद्दीने आपला कुणाबाव, नोकरचाकर, त्या

सांभाळतात. आपला मुलगा पिराजी याला आवश्यक त्या ठिकाणी योग्य सल्ला देतात.त्याप्रमाणे पिराजी ऐकतो.तो आईच्या शब्दा बाहेर जात नाही.आईवर त्याचे प्रेम व विश्वास आहे म्हणून तो प्रत्येक गोष्ट आईच्या सल्ल्याने करीत असल्याचे दिसते.

सकवारबाईचे दु:ख जेव्हा सोयराबाई यांना समजते तेव्हा त्या पिराजीला सकवारबाईचा पती संपतराव याला बोलावून आणण्यासाठी कंधार ला जाण्याचा सल्ला देतात. त्याप्रमाणे पिराजी जातो आणि संपतरावला बोलावून आणतो. यावेळी त्यांना अतिशय आनंद होतो.

गावावर दुष्काळाची छाया पडू लागली. सावकार लोकांना पिळू लागले. गाव मोडकळीस येत चालला.दुष्काळाचा कहर चालू झाला.नक्षत्रा मागे नक्षत्र कोरडे जावू लागली.पाऊस येण्याची चिन्हे दिसेनात. मजुरांना मजुरी मिळेना. जनावरांना चारा मिळेना. कडब्याचा प्रश्न निर्माण झाला.कोणी कोणाला विचारीनासे झाले. प्रत्येकजण पोटासाठी गाव सोडून जावू लागला.एकंदरीत लोक हवालदिल झाले हे पाहून सोयराबाईना रात्र-दिवस चैन पडेना. लोकांचे हाल पाहावेना.तेव्हा त्या पिराजीला म्हणतात " सात पिढ्या या गावची आपल्याकडे पाटीलकी आहे. गावची रयत आपली लेकरेबाळे.आपल्या घरातील सर्व या गावच्या जीवावर आणि लोकांच्या हातचेच मिळविलेले आहे. सर्व गावातील जनावरे आणि लोक आपल्या घरचेच समजा आणि उद्यापासून दाणा-चारा पोच करा "[३७]. यामधून सोयराबाईच्या व्यक्तीमत्वाची ओळख होते. गोरगरिबाविषयी आणि मुक्या प्राण्यावरील त्यांचे प्रेम व्यक्त होते. गावाबद्दल उदार आणि उदात्त जाणिव त्यांना असलेली दिसते.

सोयराबाईच्या सल्ल्याप्रमाणे पिराजी गावातील सर्व लोकांना बोलावून अन्नधान्य व कडबा याचे वाटप करतो. तेव्हा गावातील आलेल्या लोकांना काही गोष्टी समजाविण्याचा प्रयत्न करताना त्या म्हणतात " बाबानो, दिवस येऊ नये ते आले आहेत. काळजी करु नका. घाबरु नका.माझ्या घरी चार दाणे आहेत ते सगळे तुमचेच आहेत.तुमच्याच जीवावर ते आम्ही मिळविले. माझे म्हणू नका.तुमचेच

समजा.आहेत दाणे तोवर सगळे मिळून ओली कोरडी भाकरी खाऊ. मला माझा पिराजीराव आणि तुम्ही सारखेच.तुमच्या जिवावर आम्ही पाटील,समजलात ?"[३८] यावरुन पिराजीच्या आईची व्यापक विचार सरणी तर लक्षात येतेच पण गावा - वरील असलेले तिचे प्रेम आणि माणसामधील माणूसकीचा ओला जिव्हाळा यामुळे आपण बहारुन जातो.त्याच्यामधील मोठेपण आपणास दिसते.

पिराजी दुष्काळी परिस्थितीत अन्नधान्य वाटप करीत आहे हे ऐकून गोपाळपंत सोयराबाईकडे येतो आणि हा काय उधळेपणा लावला आहे.त्याला तुम्ही सांगत का नाही अशा ब-याच गोष्टी तो बोलतो.तेव्हा गोपाळपंताचा रोख काय तो आईसाहेब ओळखतात आणि गोपाळपंताला त्या म्हणतात" मी म्हटले आणाखी काय त्याने पाप,अन्याय आणिजुलूम केलाय की काय ? भुकेल्याना अन्न देतो,ऐवढेच ना ? मुकी जनावरे पटापट मरताहेत,ती वाचवितो .आपली रयत पोटची पोरे,आपल्या गावचे गरिब,आपले आश्रित याना भुकेल्याना वेळी दाणा - गोटा देतो एवढेच ना ?"[३९] यावरुन सोयराबाईची वृत्ती-प्रवृत्तीची आणि व्यक्तीमत्वाची ओळख पटते. प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे पिराजीला त्याच्या आईचा पाठींबा असल्याचे दिसून येते. पिराजी जे करतो आहे ते चांगलेच करतो आहे तो वाईट असे काहीच करीत नाही. यात काय गैर आहे असा प्रश्न त्या गोपाळपंतालाच विचारतात. आपण काही कारण नसताना मस्तखोराची घरे भरतो,कारकून, शिपाई,प्यादे, पोलिस सारख्या पगारी लोकांना लाच देतो. तेव्हा आपणास काही वाटत नाही पण वेळप्रसंगी गोरगरिबाला काही दिल्यास वाईट वाटून घेण्यात काय शहाणपणा आहे. आपण कितीही साठवण केली तरी रिकामेच जाणार आहोत हे सांगताना त्या म्हणतात" पिराजीराव नागडे उघडे आले. जाणारही नागडे उघडे मग काय हा दाणा आणि तो कडबा ते बरोबर घेवून जाणार आहेत ? पंत माणसाच्या बरोबर काय हो येणार आहे ? केला तेव्हा धर्मच उपयोगी पडणार नव्हे काय ?"[४०] यातून त्यांचा असलेला माणुसकीवरचा विश्वास आपणास दिसतो. पैसा,धन,संपत्ती पेक्षाही माणुसकी त्यांच्या दृष्टीने महत्वाची आहे. त्यांना दानधर्मात समाधान आहे.यातून त्यांचे मानवी जीवनाचे

तत्वज्ञान दिसून येते हे त्याचे उदार आचरण पाहून गीतेतील तत्वज्ञानाची आठवण येते.

सोयराबाईंचा देवावर विश्वास आहे.त्या धार्मिक आहेत.त्याला साक्षी ठेवूनच त्या बोलताना दिसतात. शेजारीपाजारी लोक उपाशी मरताना आमच्या गळ्याखाली घास कसा जाईल हे सांगताना त्या म्हणतात पुरणपोळीचे मोठे सुंदर जेवण तुम्हाला कोणी मसणवटीत वाढले तर घास एक तरी तुमच्याने गिळवेल का अशा काही गोष्टी त्या गोपाळपंताला सांगताना दिसतात. त्यापुढे म्हणतात गावात चू पेटेना,मूक-मूक ,भाकरी-भाकरी अशा आरोळ्या निघतात. सगळा गाव भुकेने मरतो आहे. लोक परागंदा झाले.गाव ओसाड पडला.जनावरे मेली.इष्टमित्र, नोकरचाकर,सगळे मरुन मातीत जात आहेत अशा स्थितीत का आपण बहारीचा संसार करावयाचा आहे अशा त्याच्या विचारसणीतून माणूस म्हणून जगताना दु:खीताच्या दु:खात आणि आनंदी माणसाच्या आनंदात सामिल होणे हे माणसाचे कर्तव्य आहे. हातच माणसाचे मोठेपण आहे. असे तत्वज्ञान प्रगट होताना दिसते.त्यामुळे सोयराबाईंचे व्यक्तीमत्व उठून दिसायला लागते आणि सोयराबाई या सगळ्या गावच्या ` आई ` वाटायला लागतात.

सोयराबाई आपला फारसा विचार न करता पिराजीच्या पाठीमागे धैर्याने उभे राहतात. पिराजीला सत्कार्य करावयास लावतात. काही गोष्टी समजावून देतात. त्या केवळ पिराजीच्याच आई नाहीत तर सर्व गावातील लोकांची आई होतात.प्रत्येकाच्या सुखदु:खात सहभागी होतात अशा स्थितीत परत दुष्काळ आक्राळ विक्राळ रुप धारण करतो.तेव्हा मात्र सोयराबाई पूर्णपणे धास्तावून जातात. पिराजीला काळजी घेण्याचा सल्ला देतात. एकापाठोपाठ अनेक संकटे त्यांना उघड्या डोळ्यानी पाहावी लागतात. शेत पूर्णपणे नापिक झालेले,बागाईत शेत नाहीशी झालेली, दाणागोटा संपलेला. सकवारबाईचे दु:ख,दर्याबाईचे दु:ख, पिराजीचे दु:ख या सर्वांनी त्या पूर्ण अस्वस्थ होतात आणि आजारी पडतात. जेव्हा हा सर्व संकटानी आपला मुलगा पिराजी याचे धैर्य खचत आहे याची जाणीव होताच त्या तशा अवस्थेतही पिराजीला धैर्य देतात. येणाऱ्या प्रसंगाला धैर्याने

सामोरे जावे लागते.इ. गोष्टी पटवून देतात.त्या म्हणतात " बेटा पिराजीराव बाळा असा गांगरलास रे का ? हे बघ मी आपले दु:खाचे गाठोडे सारे बांधून ठेविले. नको वर तू असा धीर सोडू ? "[४२] असा वेळप्रसंगी धीर,सल्ला त्या पिराजीला देताना दिसतात.

आमस्येच्या काळोखी रात्री १२ वाजता सोयराबाईच्या घरावर ५०-६० चोर दरोडा घालतात. घर लुटण्याचा प्रयत्न करतात.त्यावेळी मात्र समयसूचकतेनुसार सोयराबाई पिराजीला सहा बारी पिस्तूल आणि तोंडे देतात म्हणून पिराजी. त्या संकटावर दरोड्यावर मात करु शकतो. आपल्या आईचे धैर्य सांगताना तो म्हणतो" एक चोरटा ते माझ्या हातचे पिस्तुल काढून घ्यावयास धावला ते आईने पाहिले व मोठी लगबग करुन जवळच तलवार होती ती हातात धरुन लगेच त्या समशेरीने असा जोराचा वार केला की त्या चोरटयाचा हावा खांदाच उतरला"[४३] यातून त्यांच्या लढावू व्यक्तिमत्वा बरोबरच त्यांची प्रसंगावधानता ही दिसून येते.

दरोडा पडला आणि पिराजीने हत्यार चालविले. या कारणातून पिराजीला शिपाई,पोलिस अधिकारी लोक आडचणीत आणू पहात होते, ही गोष्ट ताबडतोब ओळखून सोयराबाईंनी खंबीर भूमिका घेतली. येणाऱ्या प्रसंगाला धैर्याने तोंड दिले. पिराजी करवी साहेबांना निरोप पाठविला. घडलेल्या प्रसंगा-विषयीची माहिती त्यांनी साहेबाला सांगितली,साहेब सोयराबाईची प्रसंगावधा--नता आणि दरोड्याला धैर्याने दिलेले तोंड पाहून आनंदी होतो आणि म्हणतो " शाबास। पाटील,शाबास बाईसाहेब [४४]" यातून सोयराबाईंना धीर येतो. येणाऱ्या प्रसंगाला धैर्याने तोंड देत राहतात.

दौलत्याला त्या दरोड्यामध्ये पाहून इतरांना जरी त्याच्या कार्याबद्दल शंका आली असली तरी सोयराबाईंना तो आपल्याशी बेइमानी करणार नाही असा पूर्ण विश्वास होता म्हणून त्याला जखमी अवस्थेत पहाताच तो बरा होण्यासाठी त्या धडपडत असल्याचे दिसून येते. एवढेच नाही तर दौलत्याला

हॉस्पीटल मध्ये नेताना विरोध करुन त्याला पूर्ण सांभाळण्याची जबाबदारी त्या स्व:ताहा घेतात.त्याप्रमाणे दिवस रात्र काळजी घेवून दौलत्याला बरे करतात. त्यातून त्यांची गडीमाणसाबद्दल असलेली आपुलकी आणि त्याने केलेल्या सेवेची जाणिव त्यांना असलेली दिसते.

एके दिवशी संध्याकाळी नवखा पाहुणा येतो. दोन दिवस राहून पाहुणचार घेतो.रात्रीची वेळ आहे. जोखीम जवळ ठेवायचे दिवस नाहीत असे काही तरी निमित्त सांगून एक बटवा व डबा सोयराबाईकडे देतो. या प्रसंगाबद्दल सोयराबाईच्या मनामध्ये संशय निर्माण होतो म्हणून तो बटवा घेवून त्या धैर्याने साहेबाकडे जातात.आपली बाजू सुरक्षित करतात. पुढे येणारी आपत्ती त्या टाळतात. त्यामुळे पिराजी पुढे येणाऱ्या संकटातून सहज सुटतो.यामधून सोयराबाईचे घरकर्त्या स्त्री म्हणून एक आदर्श व्यक्तीमत्व आपल्या समोर येते. स्त्री असूनही पुरुषाचे कर्तृत्व सोयराबाईच्या व्यक्तीमत्वामध्ये दिसते.त्याचे बोलणे,चालणे,वागणे हे त्यांच्या पाटीलकीला शोभण्यासारखे आहे. आदराची भावना व पाहुणचार,गावावरील प्रेम,गावच्या मातीवरील प्रेम,गोरगरिब व मुकी जनावरे यांच्यावरील प्रेम आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे माणसातील माणुसकी बद्दलचा जिव्हाळा हे त्याच्या व्यक्तीमत्वाचे पैलू आहेत. अशा सोयराबाईचा मृत्यू एके दिवशी साप चावून होतो आणि ज्यांच्या आधारावर पिराजी पाटील बिनधास्त जीवन जगत होता तो आधार नाहीसा झाल्याने पिराजीवर दु:खाचा डोंगर कोसळतो यामधून सोयराबाईचे व्यक्तीमत्व आपणासमोर येते.

३) <u>गोपाळपंत कुलकर्णी</u> --

पिराजी पाटील हा येणाऱ्या प्रसंगाला तोंड देत जीवन जगत होता. ज्यावेळी पिराजीला अनेक प्रसंगाने ग्रासले तो अडचणीत सापडला तेव्हा त्याला मित्राची आठवण होऊ लागली.तो मित्र म्हणजे गोपाळपंत कुलकर्णी. फार दिवसापासूनची दोस्ती असलेला गोपाळपंत हा पिराजी पाटलाचा जुना मित्र आहे. जेव्हा तो संकटात सापडतो तेव्हा त्याला गोपाळपंताची आठवण होते.गोपाळपंताच्या

कडून आपल्याला मदत होईल असे वाटू लागते म्हणून तो त्याला बोलावणे पाठवितो पण पिराजी आजपर्यन्त आपणास कसलीही मदत केलेली नाही म्हणून तो नाराज झालेला आहे. असे असले तरी त्याचे पिराजीवर मित्र म्हणून प्रेम आहे. पिराजीच्या दान करण्याच्या सढळ वृत्तीमुळे तो संकटात सापडू नये असे त्याला वाटते.म्हणून वारंवार गोपाळपंत त्याला सल्ला देताना दिसतो. पण त्याची पर्वा कधीही पिराजीने केली नाही.मात्र प्रसंग ओढावल्यावर त्याचा सल्ला घ्यावा,त्याला विचारावे असे त्याला वाटू लागते.बोलावल्या बरोबर गोपाळपंत केव्हाही येत असे पण काही वेळा तो आला नाही तर त्यामुळे पिराजी मनातून भीतीने दचकत असे. आणि त्याच्या मनात गोपाळपंत विषयी अनेक तर्ककुर्तक यायला लागत.सुभानबा मामा,गोपाळपंत कुलकर्णी यांना बोलावून घेतात. तेव्हा गोपाळपंत मागे पिराजीने कशा प्रकारे आपणाबरोबर आचरण केले याचे ग-हाणे मांडतो.पिराजीचा मामा गोपाळपंताची कशी तरी समजूत घालतो आणि अडचणी सोडविण्यास आपल्या सोबतीला घेतो. असे असले तरी तो पिराजीला सारखा टोचून बोलत असे त्यातून त्याची प्रवृत्ती दिसून येते. विहिरीत जीव दिलेल्या बाईला पिराजी मूठमातीची परवानगी दिली व त्या कामात त्याने पन्नास रुपये खाल्ले हे प्रकरण गोपाळपंत व मामा दोघे मिळून मिटवून टाकतात.

गोपाळपंत कुलकर्णी हा तसा प्रामाणिक व हुशार माणूस आहे. प्रत्येक गोष्ट पूर्णपणे विचाराने करणारा आहे म्हणून अडचणीच्या वेळी पिराजी त्याचा सल्ला घेत असे. पिराजीची मोलकरीन तुंगी म्हातारी तापाने आजारी पडून मरण पावली.तिच्या मरणाबाबत संशय घेण्यात येवू लागले. तुंगी म्हातारीचे प्रेत डॉक्टराकडे पंचनाम्यासाठी नेण्यात येते.खरे पाहता लाच खाण्यासाठी तुंगी मोलकरणीच्या प्रेताचा उपयोग पोलिस व गावकरी करु पाहत असतात तेव्हा पिराजी गोपाळपंताला बोलावून त्याचा सल्ला घेतो तेव्हा तो म्हणतो प्रत्येक वेळेला आपण पैसे भरीत सुटलो तर आपला निभाव लागणार नाही. त्यामुळे नवे नवे संकट आपल्यासमोर उभे राहिल, भिण्याचे कारण नाही. लोकांच्या तोंडावर खेटराने मारल्याशिवाय त्यांना निट समजणार नाही. असा सल्ला गोपाळपंत

देतो तो पिराजीला मान्य होतो. पिराजीची आई घाबरुन पोलिसांना पंचवीस रुपये देवून ते प्रकरण मिटविण्यास तयार होते. गोपाळपंत तेच काम वीस रुपये मध्ये करुन ते प्रकरण मिटवून टाकतो आणि पाच रुपये परत देतो. यातून गोपाळपंताची मुसद्देगिरी दिसून येते.

गोपाळपंत आणि पिराजी हे दोघे मित्र आहेत. ते एकमेकांना वेळप्रसंगी सल्ला देतात घेतात आणि एक मेकांच्या उपयोगी पडतात. गोपाळपंताची याची वृत्ती मात्र पिराजी इतकी उदार, व्यापक व मनमोकळी दिसत नाही. ज्यावेळी गावावर दुष्काळ पडतो लोकांचे हाल व्हायला लागतात. लोक गावसोडून जावू लागतात. तेव्हा पिराजी त्यांना सांभाळण्यासाठी आपल्या जवळ जे काही आहे ते ते देवून त्यांना जगविण्याचा प्रयत्न करतो. पिराजीचा नावलौकिक होतो. लोक त्याला आर्शिवाद देवू लागतात. मात्र गोपाळपंताला हे आवडत नसल्याचे त्याच्या आणि पिराजीच्या आईच्या संवादावरुन जाणविते. पिराजी व त्याची पत्नी यांच्या नव्या संसाराची जाणिव देवून काही उपदेश तो पिराजीच्या आईला करीतो. तेव्हा अनुभवाने शहाणी, झालेली व माणुसकी मनामध्ये जिवंत असलेली पिराजीची आई सडेतोडपणे काही गोष्टी बोलते. तेव्हा मात्र गोपाळपंत काहीही बोलत नाही. आपले कंजुष तत्वज्ञान येथे चालत नाही हे गोपाळपंत ओळखतो आणि पिराजीकडे चार पोती दाणे व चार पाच हजार कबा याची मागणी करतो. पिराजी ते देण्याचे कबूल झाल्यावर गोपाळपंत आनंदी मनाने निघून जातो.

गोपाळपंत जातीचा ब्राह्मण, मोठा म्हातारा कारकून असल्याने पिराजी त्याचा पाहिजे त्या वेळेला उपयोग करुन घेतो. पिराजी दरोडा प्रसंगात हत्यार वापरल्याने आलेल्या संकटात आणि जमादारच्या मेहुण्याने, पाहुणा म्हणून केलेली लुच्चेगिरी या प्रसंगात गोपाळपंत जातीने लक्ष देतो आणि पिराजीला संकटातून वाचवितो. असा गोपाळपंत आजारी पडतो. पिराजी त्याला भेटायला जातो. तेव्हा तापाच्या भरात गोपाळपंत म्हणतो' पाटील या, बसा आम्ही आता चाललो, माझी ही दोन मुले त्यांना मी तुमच्या हातात देतो'[४५] यातून पिराजीवर असलेला

गोपाळपंताचा विश्वास दिसून येतो. तसेच त्याच्या बोलण्यातून त्याचे गावावरील प्रेम व्यक्त होते. असा गोपाळपंत तापाच्या आजाराने मरण पावतो. तेव्हा पिराजीला फार वाईट वाटते. आईच्या पाठीमागे साथ देणारा काय तो गोपाळपंतच होता.तो ही गेल्याने पिराजीला उजवा हात गेल्याचे दुःख होते आणि त्याला गळा मोकळा केल्याशिवाय राहवत नाही.

४) सुमानबा पाटील --

'पिराजी पाटील' या कादंबरीमध्ये सुमानबा यांची ओळख प्रकरण चार मध्ये होते. सुमानबा हे पिराजी पाटील याचे मामा आहेत. त्यांचे वय साठ-सत्तर वर्षाचे आहे. सुमानबा कडे सुध्दा परंपरेने चालत आलेली पाटीलकी आहे. त्यांचे पाटीलकीचे गाव पिराजीच्या गावापासून दहा कोसावर आहे. पिराजीचे वडिल गेल्यापासून माच्याचे कसे काय चालले आहे हे पाहण्यासाठी सुमानवा अधेमधे येवून पिराजीची पूर्ण चौकशी करीत,त्याला पाहिजे तसा योग्य सल्ला देत असत,त्यामुळे मामाचा पिराजीला आधार वाटत असे .मामा आले की त्याला आनंद वाटत असे. पिराजी अलिकडे भ्रष्टाचारात गुंतला होता.त्यामुळे शिपाई,पोलिस,कारकून त्याची मानमर्यादा ठेवीत नव्हते. उघड उघड तोंडावर बोलत होते.मामा पिराजीच्या गावी आल्यानंतर ही गोष्ट त्यांना समजली.मामा मोठे विचारी आणि समंजस होते. अनुभवाने शहाणे झालेले होते ते पिराजीला काहीही बोलत नव्हते पण पिराजी मात्र मामा आपणास रागवतात,शिव्या देतात म्हणून घाबरत असे. या गोष्टींची कल्पना मामाना होती म्हणून ते त्याला काही गोष्टी समजावून सांगतात.काही गोष्टीचा सल्ला देतात ते म्हणतात" सावकाराच्या पुढून जात असावे, सरकारच्या मात्र मागे जावे, समजलास ? हे शिपाई ,हे कारकून, हे अंमलदार ही शुध्द गिधारे आहेत गिधाडे ! गिधाडे मेलेल्या मढ्याची लचके तोडतात आणि ही गिधाडे जिवंत माणसाचे लचके तोडून ठार करतात ! काय सागावे तुला ? याची सोबत नसावी"[४] असा उपदेश ते करीत.

आपला माचा पिराजी कुणाच्या फासात आडकू नये, त्याची कुठेही बदनामी होऊ नये अशी दृष्टी मामाची असते. ते म्हणतात" सावकार,वकील,

कारकून आणि शिपाई यांच्या तावडीत सापडलेला माणूस मातीला मिळालाच म्हणून समज [४७] या सर्व गोष्टी पिराजीला अनुभवातून पटल्याने तो आपले मन मामाच्या समोर मोकळे करतो. आजवर झालेली लाच, केलेली पातके, घडलेले जुलूम हे सर्व मामानां सांगतो. माझ्या हातून घडू नये ते घडले आहे. तरी ते कसे निस्तारावे ते सांगा आणि आठ पंधरा दिवस राहून या सर्वांचा निर्णय लावा अशी विनंती तो मामाना करतो. मामा विचारी, समंजस असल्याने तो मामांना वडिलासमान मानतो. त्याप्रमाणे मामा पिराजीकडे राहून त्याने केलेल्या चुका सावरण्याचा प्रयत्न करतो.

सुभानमामा पिराजीने जी काही केलेली प्रकरणे आहेत ते सोडविण्याच्या कामाला लागतो. त्यामध्ये पिराजीचा मित्र गोपाळपंत कुलकर्णी याला सहभागी करुन घेतो व त्याच्या सहकार्याने सोडवितो. प्रथम गोपाळपंत याला विश्वासात घेतो. पिराजीने विहिरीत जीव दिलेल्या बाईला मूठमातीची परवानगी देवून त्या मध्ये पन्नास रुपये खातो हे प्रकरण मामा प्रयत्नाने निकालात काढतो.

सुभानबा मामाची देवधर्मावर श्रध्दा आहे. म्हणून ते पिराजी बरोबर घरदारासोबत तुळजापूरला भवानीच्या दर्शनाला जातात. सुभानबा जरी पिराजीची उठाठेव करीत असले तरी आपल्या मुलीच्या संसाराचे दु:ख त्याच्या मनात आहे असे त्यांच्या बोलण्यावरुन जाणवते. पिराजी संपतरावकडे जाण्यास निघतो तेव्हा सुभानबा आनंदी झालेले दिसतात. निंबाजी हा आपला गडी सोबतीला देतात. यातून त्यांची संपतरावला गावी आणावयाची उत्सुकता दिसते. पिराजी संपतरा-वाला घेवून येतो तेव्हा सुभानमामाला आनंद झालेले दिसतो.

५) <u>दौलत्या</u> --

पिराजी पाटील आपण केलेले कृत्याची पाप धुऊन काढण्यासाठी तुळजाभवानी दर्शनाला घरदारासह बैलगाडीने जात असतात. त्यामध्ये दौलत्या असतो. तेथून दौलत्या या कादंबरीमध्ये डोकावताना दिसतो. दौलत्या हा पिराजीचा सवंगडी आहे, तो लहानपणापासूनचा सोबती आहे. पिराजीने भावासारखे चौदा वर्षे घरात ठेवून दौलत्याला सांभाळले. जिवाभावाचे नाते निर्माण केले. दौलत्याही

स्वभावाने चांगला आहे, त्यामुळे तो पिराजीच्या घरातील माणसापैकीच एक आहे असा असतो. गावामध्ये दौलत्याबद्दल पिराजीच्या कानावर नको त्या गोष्टी येतात त्यामुळे पिराजी दौलत्याला घराबाहेर घालतो.

पुढे काही दिवसांनी पिराजीच्या घरावर दरोडा पडतो पिराजीची आणि चोराची चांगल्या झटापटी होतात. दरोड्यात ९ माणसे मारली जातात. सकाळी पिराजी पाहतो तर जखमी आवस्थेत दौलत्या पडलेला दिसतो. याला पहाताच मात्र सर्वांना प्रथम संशय येतो की दौलत्याला पाटलाने घराबाहेर घातल्याने त्याने चोरा करवी दरोडा घातला पण पिराजी आणि त्याची आई यांना दौलत्याबद्दल पूर्ण विश्वास होता म्हणून ते त्याला वाचविण्याचा प्रयत्न करतात. दुसरे दिवशी पोलिस आधिकारी जेव्हा जखमी दौलत्याची जबानी घेतात त्यावेळी दौलत्याचे मित्रप्रेम आणि पिराजीच्या घराविषयीची आपुलकी व्यक्त होते. जबानीत दौलत्या म्हणतो" दरोडा पाटलाच्या घरी पडला असे एकून मी धावत आलो."[४८] यातून त्याची एकनिष्ठा जाणवते. तो खरा बालपणाचा पिराजीचा सोबती असल्याचे लक्षात येते.' ज्याचे खावे मीठ त्याचे करावे नीट ' या उक्ती -प्रमाणे तो संकटसमयी धावून येतो. खाल्लेल्या अन्नाची जाणिव ठेवणारा साधा भोळा सोबती म्हणून त्याचे व्यक्तीमत्व आपल्या डोळ्यासमोर येते अशा दौलत्याची खरी पारख पिराजीच्या आईने केलेली होती म्हणून दौलत्याला जखमी आवस्थेत दवाखान्यात नेताना ती विरोध करते आणि घरी संभाळण्याचे ती मान्य करते. दौलत्या जीवंत राहावा म्हणून ती देवदेवताना नवस करते,प्रार्थना करते, या मधून प्रत्यक्ष दौलत्याचे चरित्र माहित नसूनही त्याच्या काही थोड्या प्रसंग,घटना वरुन त्याचे व्यक्तीमत्व उकलायला लागते. त्यातून दौलत्याबद्दल आपुलकी वाटायला लागते.

दौलत्याची चांगली सोय पिराजीने ठेवल्यामुळे तो बरा झाला. घरात हिंडू फिरु लागला.त्याने दरोड्याची सर्व हाकिकत सांगितली.पिराजी पाटील यांच्या घरावर दरोडा पडला हे ऐकताच दौलत्या पिराजीच्या मदतीला धावत आला तो आपल्यापरिने चोरावर हल्ला करीत होता. पिराजीची गोळी त्याला

लागली आणि तो जखमी झाला. दौलत्याला आजारी अवस्थेत केलेल्या पालन - पोषणाची जाणिव आहे,तो पिराजीच्या घराशिवाय राहू शकत नाही.म्हणून तो म्हणतो" पाटील,तुम्हाला सोडून मी हलावयाचा नाही. माझा प्राण तुमच्याच घरात जावयाचा .माझे आई-बाप तुम्ही "[४९] यामधून त्याचे पिराजीच्या घरावरील प्रेम दिसून येते.त्याला या घरातून आई-वडिलांचे प्रेम मिळालेले आहे,तो या घरात प्राण सोडण्याइतपत धन्य झाला आहे,त्यात त्याची अत्यंतिक जवळीक लक्षात येते.

पिराजीची आई, गोपाळपंत असे एकापाठोपाठ एक मरण पावतात.तेव्हा तो पिराजीला आधार देतो. पिराजी दौलत्याच्या मदतीने आलेल्या प्रसंगावर मात करीत असतो.

ख्रिस्ती पाद्री गावात येतो आणि दौलत्या पाद्रीकडे आकर्षिला जातो. ख्रिस्ती धर्मामध्ये मिळणारी मदत,आपुलकी,मानपान यामुळे तो फारसा विचार न करता धर्मान्तर करतो. दौलत्याचे धर्मान्तर केल्यानंतरचे नाव डेविड साहेब हे ठेविले जाते. पिराजीची बहिण दर्याबाई ही ख्रिस्ती होते. दर्याबाईवर दौलत्याचे फार दिवसापासून आंतरिक ओढ आहे. तशा प्रकारच्या गोष्टी पिराजीच्या कानावर आल्यामुळे तो तीच गोष्ट मनामध्ये ठेवून दौलत्याला घरातून बाहेर काढतो. दरोड्याच्या प्रसंगी मदत करण्यासाठी दौलत्या येतो,जखमी होतो आणि परत पिराजीचा सोबती म्हणून वावरू लागतो. धर्मान्तरानंतर दौलत्या राहूरीस आहे असे पिराजीला समजते तेव्हा तो त्याच्याकडे जातो. त्यावेळी आपण का बाटलो याचे कारण तो स्पष्टपणे सांगतो.तो म्हणतो " दर्याबाई बाटली म्हणजे झाले, मी दर्याबाईसाठी बाटलो"[५०] ही दौलत्याची गोष्ट ऐकून पिराजी संतापतो आणि त्याच्या तोंडात मारतो, शिव्या देतो पण दौलत्याला मागिल परिस्थितीची जाणिव असल्याने तो पिराजी समोर नमतो आणि झालेल्या चुकीबद्दल क्षमा मागतो. तो म्हणतो" पाटील तुम्ही माझे आई-बाप,तुमच्याशी मी बेइमान झालो. तुमच्या पुढे मी आडवा पडलो आहे. लाथेने माझा कपाळमोक्ष केला तरी तुम्हाला पाप लागणार नाही.शेण खाऊ नये ते खाल्ले खरे "[५१] अशी

विनंती करुन तो दर्याबाईचा पत्ता देतो. केलेल्या गोष्टीचे वाईट वाटून घेवून पाश्च्यात्ताप करु लागतो. इथे दौलत्या, पिराजीचा खरा सोबती शोमण्यास काही गोष्टीत कमी पडला असला तरी प्रामाणिकपणा हा गुणामुळे तो आपल्या मनामध्ये मरायला लागतो.

६) संपतराव जाधव --

' पिराजी पाटील' या कादंबरीमध्ये संपतराव चे पात्र गौण अशा स्वरुपाचे आहे. एका प्रसंगातून संपतराव ची ओळख होते. पिराजी पाटीलचा मामा सुभानबा पाटील, त्याचा जावई म्हणजे संपतराव जाधव होय. संपतरावलाही परंपरेने देशमुखी चालत आलेली होती. संपतरावचा बाप पिंपळगावचा देशमुख होता संपतरावला सावत्र आई होती, तिचे नाव दिपाबाई. तिचे आणि संपतरावचे कधीही पटत नसे म्हणून संपतराव कंदाहारकडे नोकरीला गेला. सावत्र आईच्या त्रासाला कंटाळून संपतराव घोडेस्वाराची नोकरी इंग्रजाकडे धरली संपतराव घरादाराला कंटाळला होता [५२] त्यामुळे तो गावाकडे येत नसे. त्याची पत्नी सक्वारबाई हिची त्याला फारशी काळजी नव्हती म्हणून सक्वारबाई दु:खी असे हे सक्वारबाईचे दु:ख सुभानबा मामाला पहावत नसे. म्हणून ते आपले जावाई संपतराव याला नोकरी सोडून गावी यावे असे कळवितात पण त्यांचा संपतरावर काही परिणाम होत नाही म्हणून मामा मुलीच्या काळजीत असतो हे मामाचे दु:ख पिराजीला कळल्यानंतर तो मामानी आपल्यावर केलेल्या उपकाराची फेड करावी म्हणून तो संपतरावकडे जाण्यास तयार होतो. तेव्हा मामाला आनंद होतो. त्याच्या बरोबर निंबाजी गडी सोबतीला देतात. पिराजी व निंबाजी आगीनगाडीतून प्रवास करुन सातव्या दिवशी कंधार गाठतात. संपतरावची भेट होते. त्यामुळे पिराजीला आनंद होतो.

पिराजी संपतरावकडे मुक्काम करतो तेव्हा त्याला काही गोष्टी कळतात. संपतराव इकडे पूर्ण बिघडला होता. वाईट वळणाला लागला होता. त्याला पगार ही केवळ ७५ रुपये मिळत असे. संपतरावने घरचे नाव सोडून दिले होते. त्याने एक मुसलमान बाई ठेवली होती. तो त्या स्त्रीच्या मोहात पूर्णपणे अडकला होता. त्या स्त्रीने त्याला पूर्ण ताब्यात घेतले होते. तिच्या सांगण्याशिवाय तो काहीही

करु शकत नव्हता.इतका तो तिच्या आहारी गेला होता. यातून संपतरावला सोडविण्यासाठी पिराजी" मामा अंथरुणावर पडले आहेत रात्र-दिवस संपतराव संपतराव करिताहेत असे सांगतो." [53]तरी ही संपतरावचे मन काही वळत नाही. निंबाजी गडी म्हातारा मोठा हुशार व चलाख असल्याने त्याने युक्ती लढविली आणि ती यशस्वी झाली. तो म्हणतो, सुमानराव ची दौलत पुरुन ठेवलेली आहे,त्यामध्ये चौदा पंधरा रुपयानी भरलेल्या घागरी आहेत. त्यावर आनेक भाऊबंदाचे लक्ष आहे.मामीच्या मनात तूला देण्याचा विचार आहे.त्यासाठी तू गावी चलावे. अशा गुळचट थापाला संपतराव भुलतो आणि त्या स्त्रीच्या सांगण्यावरुन तीन महिण्याची रजा घेवून तो गावी येण्यास तयार होतो. संपतरावला कर्ज झालेले असते. पिराजी आपल्या कमरेचा बारा तोळ्याचा सोन्याचा कडदोरा विकतो आणि संपतरावचे कर्ज फेडतो.तिथे गावी निघतात. प्रवासामध्ये संपतरावला काही गोष्टीतून बोध देण्याचा प्रयत्न हे दोघे करीत असतात.मजलदरमजल करीत एकदाचे घरी येतात.तेव्हा सक्वारबाई,मामा,मामी,पिराजीची आई,यांना अतिशय आनंद होतो. सक्वारबाईला आपण संपतरावाची भेट घालून दिली याचा अत्यानंद पिराजीला होतो.

काही दिवस संपतराव गावी राहतो.निंबाजीने सांगितलेल्या गोष्टी सर्व खोटया आहेत हे त्याला कळते. तेव्हा तो पिराजी व निंबाजी याना माझे वाटोळे केले म्हणून बोलायला लागतो.तो गावी राहाण्यास तयार नसतो.सक्वारबाई ही आपल्या पतीची समजूत काढते पण त्याचा काही उपयोग होत नाही. सक्वारबाई आपल्या बरोबर नेण्यासही तो तयार होत नाही. इतक्यात संपतरावची फलटन पुण्यास आली आहे,त्याची जुनी मैत्रीण फातमा कॉलऱ्याने मेली असे दोस्ताचे पत्र येते तेव्हा संपतराव बायकोस घेवून पुण्यास जातो, पुढे पुण्यास संपतराव आणि सक्वारबाई आनंदाने राहतात.सक्वारबाईची काळजी मिटल्याने सर्वांना आनंद होतो. पुढे काही दिवसांनी संपतराव मरण पावल्याचे वर्तमान येते आणि सक्वारबाईवर पुन्हा संकट ओढावते.

## समारोप

व्यक्तिचित्रण सजीव होण्यासाठी त्या पात्राचे वर्तन व त्याच्या मनातील भावनिक आंदोलने दाखविण्यासाठी प्रत्येयकारी शब्दयोजना करावी लागते. धनुर्धारीनी तशा प्रकारचे व्यक्तिचित्रण ' पिराजी पाटील ' मध्ये केले आहे. पिराजी हा या कादंबरीचा नायक आहे. पिराजीला आपले गाव आपले घर सांभाळताना अनंत अडिअडचणीला सामोरे जावे लागले आहे, त्याचे वर्णन निवेदक करतो. त्यामध्ये अनेक व्यक्तिचित्रणे आहेत ही व्यक्तिचित्रणे चांगली रेखाटली आहेत. लेखक व्यक्तिचित्रण करताना बाह्य वर्णनापेक्षा मानसिकतेला महत्व दिले आहे. त्यामधून हे पात्र उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. ही कादंबरी ग्रामीण स्वरुपाची आहे. त्यामुळे ग्रामीण जीवनाविषयी, शेतीविषयी प्रेम असणारे पात्र निर्माण केले आहेत. मालक-गडी, नोकर-चाकर, मित्र-आप्त, इ.नात्यानेही व्यक्तिचित्रणे चांगली उतरली आहेत. त्या त्या पात्रानुसार स्वभाव रेखाटन चांगले केले आहे. उदा.आई व पिराजीचा उदारपणा, गावावरील प्रेम इ.अशा महत्वाच्या व्यक्तिचित्रणा बरोबरच काही गौण स्वरुपाचे, केवळ प्रसंगाने उल्लेखले जाणारे असे काही व्यक्ती आहेत. त्यामध्ये सरकारी माणसे, पोलिस, कारकून, सावकार व व्यापारी, कामाबाई, सखुबाई, ख्रिस्ती पाद्री, जमादार, फौजदार इ.आहेत या पात्राच्या अनुषंगाने कादंबरीचा आशय शब्दबध्द झाला आहे.

## संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १ | धनुर्धारी | 'वाईकर भटजी', श्री रा.टिकेकर, राष्ट्रवैभव प्रेस, मुंबई ४, पुनर्मुद्रण १९५६, पृ.२. |
| २ | तत्रैव | पृ.४ |
| ३ | तत्रैव | पृ.४६-४७ |
| ४ | तत्रैव | पृ.६२ |
| ५ | तत्रैव | पृ.६७ |
| ६ | तत्रैव | पृ.६८-६९ |
| ७ | तत्रैव | पृ.७९ |
| ८ | तत्रैव | पृ.८७ |
| ९ | तत्रैव | पृ.१०० |
| १० | तत्रैव | पृ.१०४ |
| ११ | तत्रैव | पृ.१०६ |
| १२ | तत्रैव | पृ.१०९ |
| १३ | तत्रैव | पृ.३ |
| १४ | तत्रैव | पृ.४ |
| १५ | तत्रैव | पृ.७९ |
| १६ | तत्रैव | पृ.९१ |
| १७ | तत्रैव | पृ.६२ |
| १८ | तत्रैव | पृ.६६ |
| १९ | तत्रैव | पृ.७२ |
| २० | तत्रैव | पृ.५१ |
| २१ | तत्रैव | पृ.५५ |
| २२ | तत्रैव | पृ.९५ |
| २३ | तत्रैव | पृ.१४१ |

| | | |
|---|---|---|
| २४ | धनुर्धारी | पिराजी पाटील, इंदिरा प्रकाशन, राष्ट्रवैभव प्रेस, मुंबई-४, पुनर्मुद्रण १९५३, पृ.१९. |
| २५ | तत्रैव | पृ.२३ |
| २६ | तत्रैव | पृ.२४ |
| २७ | तत्रैव | पृ.२५-२६ |
| २८ | तत्रैव | पृ.२६-२७ |
| २९ | तत्रैव | पृ.२९ |
| ३० | तत्रैव | पृ.३२-३३ |
| ३१ | तत्रैव | पृ.३४ |
| ३२ | तत्रैव | पृ.३४ |
| ३३ | तत्रैव | पृ.७५ |
| ३४ | तत्रैव | पृ.८५ |
| ३५ | तत्रैव | पृ.८८ |
| ३६ | तत्रैव | पृ.९६ |
| ३७ | तत्रैव | पृ.७३-७४ |
| ३८ | तत्रैव | पृ.७५ |
| ३९ | तत्रैव | पृ.७८ |
| ४० | तत्रैव | पृ.७९ |
| ४१ | तत्रैव | पृ.७९ |
| ४२ | तत्रैव | पृ.८९ |
| ४३ | तत्रैव | पृ.९३ |
| ४४ | तत्रैव | पृ.९६ |
| ४५ | तत्रैव | पृ.११२ |
| ४६ | तत्रैव | पृ.४२ |
| ४७ | तत्रैव | पृ.४२ |
| ४८ | तत्रैव | पृ.९८ |
| ४९ | तत्रैव | पृ.१०९ |

| | | |
|---|---|---|
| ५० | धनुर्धारी | ` पिराजी पाटील`<br>इंदिरा प्रकाशन, राष्ट्रवैभव प्रेस,<br>मुंबई-४, पुनर्मुद्रण १९५३, पृ. १२५. |
| ५१ | तत्रैव | पृ. ५० |
| ५२ | तत्रैव | पृ. ५० |
| ५३ | तत्रैव | पृ. ५६ |